# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवायं समर्पिता

## दिनांक १८.८.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिनांक १८ ऑगस्ट २००५ रोजी मा.महापौर श्री किशनचंद लेखराज तणवानी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दूपारी ३.५० वाजता ''वंदेमातरम् '' या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१४. स.स.श्रीमती पाटील अलका रमेश
१५. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१६. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१७. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१८. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगलाल
२२. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२३. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२४. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२५. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२६. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२७. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२९. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३०. स.स.सौ.यास्मीन बेगम अ.कदीर
३१. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३२. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३३. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३४. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल

३५. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३६. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३७. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३८. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३९. स.स.श्री.खान निसार मो.खान
४०. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४१. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
४२. स.स.सौ.राऊत छाया विलास
४३. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४४. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४५. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४६. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४७. स.स.श्री.अमोदी अबुबकर बीन सईद
४८. स.स.सौ.शमशाद बेगम शेख हफीज
४९. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
५०. स.स.श्री.पटेल सलीम समशेर पटेल
५१. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५२. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५३. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
५४. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५५. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५६. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५७. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५८. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५९. स.स.सौ.महाजन मनिषा अमर
६०. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
६१. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
६२. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
६३. स.स.श्री.खुडे विजय किसन
६४. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
६५. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६६. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६७. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६८. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६९. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
७०. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
७१. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७२. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७३. स.स.श्रीमती वाघमारे पार्वताबाई विजय
७४. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७५. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७६. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७७. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप

७८. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७९. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
८०. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८१. स.स.सौ.जैन अल्पा विकास
८२. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८३. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८४. स.स.श्री.जहागिरदार अजीज मुख्तार
८५. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**संवाद :**

श्री.संजय सिरसाट : शहरात कचरा साठल्याच्या बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत त्या संबधी चर्चा करण्यात यावी.

श्री.अब्दुल रशीद खॉन : वार्ड कार्यालय वार्ड समित्या, निर्माण करण्यात आल्या चांगले काम केलेले आहे परंतू शहरातील कचरा उचलण्याची कार्यवाही होत नाही.

डॉ.भागवत कराड :मुंबई,परभणी,सांगली व राज्याच्या इतर भागात मोठया प्रमाणात पाऊस झालेला असून अनेक लोक मृत्यू झाले आहे. त्यांना ०२ मिनिटे या सभागृहात श्रध्दाजंली अर्पण करावी तसेच ज्या ज्या वेळी देशभरामधे संकट आले त्या त्या वेळी महानगरपालिकेने आर्थिक मदत केलेली आहे गुजरात मधे भुंकप झाला त्यावेळी या महानगरपालिकेच्या वतीने ३० लक्ष रूपये निधी देण्यात आलेला होता. त्याप्रमाणेच पुरामूळे जे मृत्यू पावलेले आहे त्यांचे कुटूंबीयांना तसेच ज्याची आर्थिक हाणी झालेली आहे. त्यांना काही तरी आर्थिक मदत देण्याची आवशकता आहे.या बाबत निर्णय घेण्यात यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : सर्वांनी ०२ मिनिटे श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.

यावेळी सर्वांनी सभागृहात ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण केली.

श्री.अ.रशिद खॉन : तसेच ज्यांचे पावसामूळे आर्थिक नुकसान झालेले आहे त्यांना आर्थिक मदत देण्यात यावी . पावसामूळे अनेकांची घरे पडलेली आहे वित्तहानी झालेली आहे. शहरात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिग पडलेले आहेत. ४-४ दिवस कचरा उचलला जात नाही.मा.महापौर तसेच मा.आयुक्त यांचेही अनेकवेळा ही बाब निदर्शनास आणून दिलेली आहे तरीही कार्यवाही होत नाही. नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवू शकते. याची दखल घेण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे :माझ्या वार्डात सुजाता हौसींग सोसायटी येथे अतिक्रमण झालेले आहे या संदर्भात मी मागील बैठकीत मुद्दा उपस्थित केला होता.कार्यवाही करण्याची सूचना आपण दिलेल्या होत्या मी ही अनेक वेळ संबधित अधिकारी यांना पत्र दिलेले आहे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मा.महापौर : अगोदर साफसफाईच्या संदर्भात चर्चा करावी त्यानंतर इतर विषय घेतले जातील.

श्री.सलीम खान : सभेची वेळ सकाळीच असावी दुपारी सभा आयोजीत केल्यास नागरीक कार्यालयात येतात त्यांना अधिकारी भेटत नाही.

मा.महापौर : आपण केलेल्या सूचनेचा विचार केला जाईल.

श्री.अब्दुल रशीद खान : शहरात मोठया प्रमाणात कचरा पडून आहे उचलला जात नाही या संदर्भात चर्चा होवून योग्य त्या सूचना कराव्यात.

(याच वेळी स.सदस्य श्री सिताराम सूरे हे माझ्या प्रश्नाचा खुलासा अगोदर करावा म्हणून मा.महापौर यांचे डायस जवळ जाऊन मोठमोठयाने मागणी करतात.)

मा.महापौर : कचऱ्याच्या संदर्भात अगोदर चर्चा करावी स.सदस्य श्री सुरे यांना विनंती की आपल्या प्रश्नाचा खुलासा घेतला जाईल आपण आपल्या जागेवर बसावे.

श्री.संजय सिरसाट :गेल्या काही दिवसापूर्वी झालेल्या मोठया प्रमाणात बदल्या व शहरातील मोठया प्रमाणात झालेली घाण आठवडी बाजार, तसेच भरती प्रकरण, शिपाईचे मजूर या संदर्भात अगोदर चर्चा करण्यात यावी सर्वांना चर्चा करण्याची संधी देण्यात यावी त्यानंतर विषय पत्रिका घेण्यात यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: चर्चा करण्यासाठी ठराविक वेळ देण्यात यावा.

श्री.सिताराम सुरे : मी केलेल्या प्रश्नाचा खुलासा घेण्यात यावा. सदर ठिकाणी अतिक्रमण होवून १०० लोकांचा रस्ता बंद केलेला आहे अधिकाऱ्यानी यात लाचलुचपत घेवून काम होऊ दिले . तीन महिण्यापासून मी संबधित अधिकारी यांना पत्र देत आहे कार्यवाही होत नसून आजच्या आज झालेले अतिक्रमण काढण्यात यावे.

मा.महापौर :प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी : सुजाता हौसींग सोसायटीमधे झालेल्या अनधिकृत बांधकाम पाडण्या संदर्भात स.नगरसेक तसेच तेथील नागरीकांचा या विभागाकडे सतत पाठपूरावा चालू आहे या बांधकाम संदर्भात संबधीतास नोटीस देण्यात आलेली होती तद्नंतर सदर बांधकाम त्या सोसायटीमधे येते का याचा अभिप्राय नगर रचना विभागाकडून घेण्यात आला असता सदरील रेखांकन मंजूर नसून रिवाईज प्रस्ताव दाखल करावा. असे नगर रचना विभागाने या विभागास कळविले आहे. रस्त्या संदर्भात श्री रगडे श्री म्हस्के या दोन पार्टीमधे न्यायालयात वाद आहे. या संदर्भात न्यायालयाचे स्पष्ट निर्देश नसल्यामूळे आणि रस्त्यामधे बांधीत होणारी नेमकी मिळकत कोणती या संदर्भात नगररचना विभागाचे स्पष्ट निर्देश प्राप्त न झाल्यामूळे अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही झालेली नाही.

श्री.संजय सिरसाट : स.सदस्य श्री सुरे यांनी नागरीकांचे निवेदन दिले.नगररचना विभागाने कशाच्या आधारे रिवाईज परवानगी घ्यावी म्हणून निर्देशित केलेले आहे?

मा.महापौर : सुजाता हौसींग सोसायटीचा रस्ता बंद झाला तो रस्ता लेआऊटमधे होता का एवढाच खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी : ले-आऊट मधे रस्ता दर्शविण्यात आलेला आहे तसा अभिप्राय नगररचना विभागाने दिलेला नाही ले आऊट मंजूर नसल्याबाबत नगररचना विभागाने कळविले नाही.

मा.महापौर : नगररचना विभागाने प्रशासकीय विभागास या संदर्भात काय अभिप्राय दिलेला आहे याची माहिती नगररचना विभागाने दयावी.

डॉ.भागवत कराड : प्रशासकीय अधिकारी यांनी जाणून बूजून दिरंगाई केलेली आहे अनधिकृत बांधकाम होवू दिले त्यांचेवर कार्यवाही करण्याची गरज आहे.

मा.महापौर : ऐनवेळी हा चर्चेला विषय आलेला असल्यामूळे नगररचना विभाग तसेच प्रशासकीय अधिकारी यांनी अर्धा तासात या संबधींची संचिका या सभागृहात सादर करावी व खुलासा करावा.

श्री.रेणूकादास वैद्य : प्रशासकीय अधिकारी काहीही कार्यवाही करणार नाही शहानूरवाडी भागात गट न. ३७ ही महानगरपालिकेची जागा असून भूसंपादीत केलेली आहे सदर जागेवर ८ लोकांनी अतिक्रमण करून तेथे घरे तयार केलेली आहे या संदर्भात संपूर्ण अहवाल मालमत्ता विभागाने प्रशासकीय विभागाकडे ७ जूलै २००५ रोजीच सादर केला असून अदयाप त्या संदर्भात कार्यवाही केलेली नाही .या संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्याची गरज आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : या शहरात असे किती ठिकाणी महानगरपालिकेच्या जागेवर व इतर जागेवर अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे झालेली आहे याची अगोदर माहिती ध्यावी तसेच नाल्यावर जे अतिक्रमण होत आहे ते थांबवू शकतो मुंबई सारखी परीस्थिती या शहरात होवू शकते याचा विचार करावा.नाल्याच्या जागा अगोदर संरक्षीत कराव्यात कूणास ही नाल्यावर परवानगी देऊ नये व बांधकाम होवू देवू नये. अशी माझी सूचना आहे.

श्री.संजय सिरसाट : ज्या ठिकाणी परवानगी घेतलेली नाही अनधिकृत बांधकाम होत असेल ते त्वरीत काढावे अशा कामास हे सभागृह पांठीबा देणार.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : नाल्यावर अनधिकृत परवानगी, ती रद्द करावी. लागले तर मोबदला द्यावा.

मा.महापौर : गट नं.३७ च्या संदर्भातील ही संचिका संबधित अधिकारी यांनी सादर करावी व खुलासा दयावा.

श्री.अब्दुल रशीद खान : स.सदस्य श्री वैद्य यांनी जो गट नंबर बाबत सूचना केली ती जागा भिमसींग परदेशी यांची आहे महानगरपालिकेने एक एकर जागा होती, धोबी घाटसाठी जागा घेतलेली होती. एक एकर जागा ही शैक्षणिक झोनसाठी होती, ऐनवेळी प्रश्न उपस्थित केल्याने उत्तर देणे शक्य होत नाही. शहरात कचऱ्याचे ढिग झालेले असून कचरा उचलला जात नाही. येथील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवू शकते. माझ्या वार्डात ११ मजूर लोक साफाईसाठी होते आता सध्या ३ आहे.वार्ड कार्यालय करण्यात आले व मोठया प्रमाणात बदल्या करण्यात आलेल्या आहेत हे सर्व नियोजनानूसार झालेले दिसून येत नाही.चार चार दिवस सफाई मजूर येत नाही दररोज सफाई केव्हापासून होणार आहे यावरून वरीष्ठाचे खालच्या अधिकाऱ्यावर वचक नाही कचरा उचलणयासाठी पत्र दयावे लागते ही बाब योग्य नाही. दखल घ्यावी.

श्री.दिलीप गायकवाड : अतिक्रमण विभागातील जे इमारत निरीक्षक आहेत ते गेल्या १० वर्षापासून एकाच ठिकाणी काम करतात एक दोन महिणे बदल्या होतात पून्हा त्याच विभागात कसे येतात माझ्या वार्डात चांगल्या प्रकारे दररोज कचरा उचलला जातो.

श्री संजू रिडलॉन : माझा वार्ड गांधीनगर, या भागातील कचरा उचलण्यासाठी मी संबधीत अधिकारी यांना अनेक वेळा विनंती केली ३० ते ३५ कर्मचारी होते आता त्यांना इतर भागात कचरा उचलण्यासाठी पाठविले जाते माझ्या वार्डात मा.आयुक्त यांनी प्रत्यक्ष भेटही दिली दररोज २ ते ३ मजूर काम करतात आणखी मजूराची आवशकता आहे.

श्री. प्रशांत देसरडा :माझा वार्ड वार्ड कमेटी फ मधे समाविष्ट केलेला असून पूर्वी जे मजूर सफाईसाठी होते ते इतरत्र वार्डात शिफ्ट केले, नवीन कर्मचारी दिले, यापूर्वी असे सांगण्यात आले की पूर्वी ज्या वार्डात कर्मचारी काम करीत होतेत्यांचे सह वार्ड शिफ्ट केला परंतु परीस्थिती ही वेगळी आहे माझ्या वार्डात जे मजूर होते ते दूसरीकडे शिफ्ट झालेले आहे ११ कर्मचारी होते आता ६ ते ७ मजूर काम करतात.वार्ड अधिकारी यांना विचारणा केली की वार्ड हद्य कुठपर्यत आहे तर नाल्यापर्यतची हद्य आहे असे सांगण्यात आले.परंतु माझ्या वार्डातील काही वसाहत नाला सोडून बाजूला पण

येत आहे.बाजूचा जो वार्ड आहे तो दुसऱ्या वार्ड कमेटीमधे येतो .अधिकारी ही वसाहत माझ्या हद्दीत येत नाही असे सांगून त्या भागात साफसफाई होत नाही तर अशा भागातील सफाई कोणी करायची .२० ते २५ दिवसापासून बायजीपूरा हा स्लम भाग असून या भागात साफ सफाई झालेली नाही ही सफाई कोणी करायची असा प्रश्न आहे.

श्री. वसंत नरवडे : या महानगरपालिकेचे वार्ड कार्यालय तयार करण्यात आले त्या बध्दल मा.आयुक्त व मा.महापौर यांचे अभिनंदन करतो.जरूर हे काम चांगले झाले परंतू कचरा उचलून गाडीमधे टाकणाऱ्या कर्मचाऱ्याच्या बदल्या केल्या नसत्या तर ही परीस्थिती निर्माण झाली नसती. जेथे १०-१० कर्मचारी होते तेथे आता ३-३ कर्मचारी काम करतात गाडया वरील कर्मचारी इतर झोन मधे पाठविले स्वच्छता निरीक्षक व गाडयावरील मजूर या संदर्भात लक्ष देण्याची गरज होती. माझ्या वार्डात तीन गाडया कमी असल्यामूळे इतका मोठा कचरा आजूबाजूच्या वार्डातील पैठणगेट येथील इमारतच्या पार्कीग मधे बाहेरून आलेला कचरा जमा केला जातो रस्त्याच्या कडेला कचरा कुंडी भरली जाते आणि कचरा जमा केला जातो या संदर्भात प्रत्यक्ष आपण पाहणी करावी पैठणगेट येथील हॉलमधे कचरा टाकला जात होता मी तो बंद केले असून त्यामूळे दुकानदाराना त्रास होत आहे कचरा गाड्यावर कर्मचाऱ्याच्या नियुक्त्या तात्काळ करून कचरा गाडी जास्त प्रमाणात नसेल तर खाजगी गाडया भाडेने घेवून कचरा उचलण्याची कार्यवाही करण्यात यावी व हा कचरा शहराबाहेर टाकला गेला पाहिजे.याची खबरदारी घ्यावी.माझ्या वार्डात २७ मजूर होते आता ११ मजूर काम करतात संपूर्ण साफसफाई होत नाही प्रत्येक वेळेस अशा समस्या आपल्या पर्यत येणे योग्य होणार नाही जे काही अधिकार देणार आहे ते देण्यात यावे जेणे करून काही कामांना सुरूवात होईल.वार्ड अभियंता याचेकडून संपूर्ण काम होणार नसून वार्ड अधिकारी तसेच वार्ड अभियंता यांचे दोघाच्या सम्मतीने संचिका मान्यता झाली पाहिजे.नसता दोन्ही अधिकारी वेगवेगळे काम करतील तर यामूळे नागरीकाच्या समस्या आणखी वाढतील .दोन्ही अधिकाऱ्यांना सारखेच अधिकार देण्यात यावे.

श्रीमती अलका पाटील : माझ्या वार्डातील नुरकॉलनीतील नाल्याची सफाई मागील काही दिवसापासून झालेलीच नाही नाल्यात रस्त्याच्या खाली जे पाईप टाकले त्यात कचरा साचतो पाणी आडते व मोठया पावसामूळे नागरीकांच्या घरात पाणी जाते अशा ठिकाणची साफसफाई करण्यात यावी अशा ठिकाणची साफसफाई करण्यात यावी तसेच माझ्या वार्डात मेडीकल कॉलेज घाटी दवाखाना असून या दवाखान्याचा कचरा घाण बाजूच्या कचरा कूंडीत टाकून जाळण्यात येते त्याचा धूर नागरीकाच्या घरात पसरतो यामूळे नागरीकाचे आरोग्य धोक्यात येवू शकते त्यासाठी घाटी दवाखान्याचे डिनना या बाबत पत्र देवून कचऱ्याची विल्हेवाट कशी होईल या बाबत कळवावे घाटी दवाखान्याच्या बाजूलाच मोठया प्रमाणात कचरा साचलेला आहे कचरा उचलत नाही ही जबाबदारी कोणाची आहे, हे ठरविण्यात यावे.

श्री.रेणूकादास वैद्य : माझ्या वार्डात २५ ते३० कचरा कुंडया आहेत त्यात इतर भागातील सफाई कर्मचारी कचरा आणून टाकतात तो कचरा उचलण्यासाठी वाहन संख्या कमी आहे एक ट्रक वार्डसाठी आहे ४ -५ कुडंयातील कचरा एका गाडीत जातो उर्वरीत कचरा शिल्लक राहतो तो उचलला जात नाही त्यासाठी ट्रकची संख्या वाढवावी जेणे करून सर्व ठिकाणचा कचरा उचलला जाईल.

सौ. लता दलाल : वार्ड कार्यालय निर्माण केली, झालेल्या बदल्या या बाबत धाडसी निर्णय घेतल्याबध्दल मा.आयुक्त तसेच मा.महापौर यांचे अभिनंदन करते.ही

महानगरपालिका १९८२ पासून आहे जसा शहराचा व्याप वाढत गेला त्याप्रमाणे कर्मचारी भरती केलेले आहे. कर्मचारी तेच आहे वाहने तीच आहे ,अधिकारी तेच आहे असे असतांना फक्त वार्ड कार्यालय निर्माण केली हा एक नियोजनाचा भाग होता.कचरा का उचलला जात नाही याचे कारण प्रशासनाने शोधावे.वार्ड अधिकारी व वार्ड अभियंता अमूक आहे हे आम्हाला दाखवून दिले . परंतु कोणती कामे कुणाकडे होणार अमुक तक्रार कुणाकडे दयायची याबध्दल काही सुसूत्रता नाही ज्या अधिकारी कर्मचारी यांना जबाबदाऱ्या दिल्या आहे त्याप्रमाणे काम करण्याच्या सूचना देण्यात याव्यात तसेच पाऊस हा सतत रिमझिम चालू आहे त्यामूळे डास व इतर जंतु याचे प्रमाण वाढत आहे.या संदर्भात कार्यवाही केली पाहिजे नसता या शहरातल्या नागरीकाच्या तक्रारी वाढत जातील व नागरीकांना रोगरोईला बळी पडावे लागेल याची प्रशासनाने दखल घ्यावी जे काम ज्यांना सोपवून दिले त्यांचेकडून ती ती कामे करून घेण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे :माझ्या वार्डात सफाईसाठी १५ कर्मचारी दाखवतात प्रत्यक्षात ४ कर्मचारी काम करतात ११ कर्मचारी कुठे आहे याचा खुलासा होत नाही.

श्री.महेश माळवतकर : महानगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढया मोठया प्रमाणात बदल्या करण्यात आलेल्या आहे त्याबध्दल प्रशासनाचे व आपणा सर्वांचे अभिनंदन करतो अशी चर्चा सध्या चालू आहे की.मा.आयुक्त नवीन आहे नवीन निर्णय घेतलेले आहे यात फेरफार होवू शकते मा.आयुक्त यांना विनंती की या शहराची स्वच्छता लक्षात घेता विकास होण्याच्या दृष्टीने जे बदल्या संदर्भात आपण पाऊल उचलले असेल तर घेतलेल्या निर्णयावर आपण ठाम रहावे जेथे नेमणूक केली तेथेच त्या कर्मचाऱ्यानी काम केले पाहिजे काही कर्मचारी कागदोपत्री काम करतात तर कुणी ऑफ द रेकॉर्ड काम करतात समांतर बदली करण्याची कार्यवाही प्रशासनाकडे न जाता काही कर्मचारी करण्याच्या प्रयत्नात आहे. तो प्रयत्न मा.आयुक्तांनी हाणून पाडला पाहिजे.जेथे बदली झाली तेथे त्या त्या कर्मचाऱ्यानीकामे केले पाहिजे जर काम करीत नसेल तर त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे.माझ्या वार्डातील एक १० हजाराचे काम होते ते काम कुणाच्या स्तरावर करून घ्यायचे हे वार्ड अभियंता यांना समजेना.अशी कार्यवाही होत राहिल्यास वेळ वाया जाईल व नागरीकाच्या समस्या तक्रारी वाढतील व प्रश्न सुटणार नाही त्यासाठी याकडे जातीने लक्ष दिले पाहिजे.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर : वार्डात साफसफाई करण्या संदर्भात दोन वेळेस निवेदने दिलेली आहे तसेच औषधी फवारणी करावी म्हणून कळविले होते. परंतू कार्यवाही झाली नाही पूर्वीच्या कचरा कुंडया गायब झालेल्या आहेत . कचरा उचलण्यासाठी जे कन्टेनर लागते ते महानगरपालिकेकडे कमी आहेत. संपूर्ण वार्डात देवू शकत नाही.कन्टेनरची संख्या वाढवावी तसेच वार्डात कचरा कुडंया केव्हा देण्यात येणार आहे याची माहिती घ्यावी.

सौ.पार्वती वाघमारे :माझ्या वार्डात गजानन नगर, भारतनगर तसेच मातोश्रीनगर भागात कचरा उचनण्यासाठी गाडी चालू केली त्याबध्दल अभिनंदन करते. माझ्यावार्डात पाण्याची समस्या आहे ती सोडविण्यात यावी.

सौ. अंजली कोडेकर : शहरात कचरा पडलेला आहे आरोग्याच्या दृष्टीने हे घातक आहे औषधी फवारणीची व्यवस्था केलेली आहे का , फोगींग द्वारे फवारणी करावी तसेच मलेरीया रोग न होण्यासाठी ती फवारणी करण्यात यावी औषधी फवारणी होते की नाही याची चौकशी करावी.

श्री. संजय केनेकर : तत्कालीन महापौर यांनी जनता दरबार आयोजित केला होता त्यावेळी अनेक नागरीकांनी तक्रारी केलेल्याहोत्या मीही तक्रार केलेली आहे. अजिंठा प्रेसच्या

बाजूला कचऱ्याचे ढिगार असून ६ महिण्यापासून तो कचरा उचलला नाही अधिकारी यांना माहिती दिली असता सदर कचरा मशीन लावून काढला जाईल असे सांगण्यात आले त्या कचऱ्याच्या ढिगाऱ्याच्या बाजूलाच सार्वजनिक पाण्याचा नळ आहे नागरीक तेथे पिण्याचे पाणी भरतात या कचऱ्यामूळे तेथे उदींर,घूस, डूकरे अशा प्रांण्याचा सुळसूळाट आहे त्यामूळे नागरीकांना रोगराई होऊ शकते तेथील कचरा त्वरीत काढण्याबाबत सुचना कराव्यात.

सौ. अनिता घोडेले : वार्ड ९८ मधील कचरा गाडी येत होती ती वार्ड क्र ५ मधे पाठविण्यात येत आहे ती गाडी परत वार्ड क्र ९८ मधे देण्यात यावी. वार्डात सफाई करणारे मजूर येतात परंतू गाडी नसल्यामूळे ते परत निघून जातात.

श्री. पुनमचंद बम्हणे : माझ्या वार्डातसफाईचे कामासाठी एकही मजूर नाही. त्यामूळे साफसफाई होत नाही.

श्रीमती खान मेहरून्नीसा : माझ्या वार्डात साफसफाई होत नसून कचरा गाडयाची आवशकता आहे कचरा उचलला जात नाही लहान गल्ल्या असल्यामूळे मोठया गाडया तेथे जात नाही लहान गाडयाची आवश्यकता आहे. वार्ड कार्यालय झाल्यापासून मजूरांची संख्या कमी झालेली आहे वाढविण्यात यावी.

श्री.मो.जावेद मो.इसहाक : यापूर्वी संपूर्ण शहरातील कचरा उचलला जात असे आताच का उचलला जात नाही याचे कारण काय? वार्ड कार्यालय झाल्यापासून नागरीकांना खूप त्रास होत आहे पूर्वी प्रत्येक झोनला एक गाडी देण्यात आलेली होती.आता असे झालेले आहे की एकच रस्ता अनेक वार्डात येत आहे.वार्ड वाईज गाडी देण्यात आली परंतू प्रत्येक गाडी चालक सांगतात की हा भाग माझ्याकडे येत नाही त्यामूळे कचरा उचलला जात नाही.कचरा उचलण्याचे नियोजन हे रस्त्यानूसार करण्यात यावे.

श्री.शशांक विसपूते : गारखेडा भागात घंटा गाडी सूरू झाल्यामूळे घरातून कचरा उचलला जातो परंतू तो कचरा एखादया रिकाम्या जागेत नेवून टाकला जातो. घरातून कचरा उचलल्यानंतर लगेच गाडीत टाकण्यासाठी तेथे कंटेनर उपलब्ध असावी.कचऱ्याची गाडी आली नाही तर पून्हा जागेवर टाकलेला कचरा हा हवेने उडून जातो व घाण पसरते. गारखेडा भागात जो नैसर्गिक प्रवाह आहे, तो बंद होत आहे. प्लॉटींग होत आहे, ती प्रशासकीय अधिकारी यांनी होवू देवू नये. नाल्याचा नॅचरल प्रवाह वळवून जागा तयार केलेल्या असून अतीक्रमण झालेले आहे या ठिकाणी नक्कीच भविष्यात अडचण येवू शकते. प्रशासकीय अधिकारी यांनी सुध्दा म्हटले की नाला वळवून अतिक्रमण केलेले आहे याकडे लक्ष देण्याची गरज आहे पूढील अडचणी टळतील.

श्री.संतोष खेंडके : घंटा गाडी साठी जो घंटा लावण्यात आलेला आहे त्यास हिन्दू धर्मात पवित्र मानले जाते तो काढण्यात येवून घंटा वाजविण्यासाठी वेगळी व्यवस्था करण्यात यावी.

सौ.सुशिला रगडे : शहरातील सर्व कचरा माझ्या वार्डात आणून टाकला जातो परंतू त्याची व्यवस्थीत विल्हेवाट लावण्यात येत नाही हा कचरा केव्हा उचलला जाईल यांची माहिती दयावी.

श्री.संतोष जेजूरकर : जेव्हापासून वार्ड कार्यालय झाली तेव्हापासून माझ्या वार्डात गाड्या सूरू करून दररोज कचरा उचलला जातो. व साफसफाई सुध्दा होते. धन्यवाद.

श्री. गजानन बारवाल :पहिल्यादांच मोठया प्रमाणात कर्मचाऱ्याच्या बदल्या करण्यात आलेल्या असून निश्चितपणे काही अडचणी निर्माण झालेल्या आहे. हे सर्व करीत असतांना काही गोष्टींची दखल घेणे सुध्दा जरूरीचे आहे.माझ्या वार्डाची हद्दीलगत छावणीचा काही भाग येतो तसेच एमएसआरडीसी जो रस्ता आहे तो सुध्दा येतो.छावनीची जी हद्द

आहे तेथील नाले साफ होत नाही त्यामूळे पाणी साचल्यास ते माझ्या वार्डात येते. पूलाच्या खाली ७०० डायमिटरचे पाईप आहे जास्त पाऊस झाल्यास पाणी त्यातून पूर्ण जात नाही.व रस्त्यावर घरामधे पाणी येते.एमएसआरडीसीने एक नाला हा श्री.धूत यांचे घरापासून ते पदमपूऱ्यापर्यंत आणून सोडलेला आहे. तेथे कचरा साचतो. एकदम बंद आहे.संबधीत अधिकारी यांना मी बोलवून घेतले होते त्यांनी त्याचा प्रवाह वेगल्या पध्दतीने वळविला परंतू हा काही पर्याय आहे असे मला वाटत नाही.या संदर्भात छावणी बोर्डशी चर्चा करून हा प्रश्न कसा सोडविला जाईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे.ज्या प्रमाणे सायंकाळच्या वेळेस ओपीडी चालू करण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे त्याप्रमाणेच सायंकाळी किंवा रात्रीच्या वेळी सुध्दा कचरा उचलणे शक्य होत असेल तर तो उचलला जावा अशी विनंती आहे.घंटा गाडयाची आवश्यकता आहे तसेच काही ट्रकस् ही आवश्यक आहे लहान ट्रक गाडी घेण्यात यावी जेणे करून लहान गल्ल्यामधे त्या जावू शकतील.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी : खिवसंरा पार्क ,त्रिमूर्ती चौक भागात कचरा कुंडी आहे परंतू तेथे चिखल झालेला आहे त्यामूळे लोक कचरा कुंडीत कचरा टाकत नाही तसेच खिवसंरा पार्क येथे सिध्दी विनायक मंदिरासमोर ही परीस्थिती निर्माण झालेली आहे.यामूळे आजूबाजूचे वातावरण पूर्ण दूषित होते अशा कचरा कुंडयाच्या बाजूला मूरूम टाकण्यात यावा व औषध फवारणी करावी. असे केल्यास नागरिक कचरा हा कचरा कुंडीमधे टाकतील.

श्री.बैनाडे कवरसिंग : घाटी परीसर व इतर काही मोठया चौकापासून जे मोठमोठे रस्ते जातात त्या रस्त्यावर गॅरेज दुकानधारक यांनी रस्त्यावर घाण करून ठेवलेली आहे ऑईल पडलेले दिसेल त्यामूळे दुर्गधी पसरते व वातावरण खराब होते तसेच एमजीएम हॉस्पीटल कडून एन ६ कडे रस्ता जातो त्या रस्त्यावर एका बाजूने गॅरेजवाल्यांनी पूर्ण रस्त्यावर घाण करून ठेवलेली आहे.अनेक ठिकाणी गॅरेजच्या बाजूला रस्त्यावर गाडया उभ्या असतात.तसेच सांस्कृतिक मंडळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर गॅरेजवाल्यांनी रस्त्यावर घाण करून ठेवलेली आहे हे दिसून येईल. या संदर्भात पाहणी करावी व त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करावी.

श्री.अमोदी अबुबकर :वार्ड क्र ५२ हा इंदिरानगर बायजीपूरा स्लम भाग आहे . हा वार्ड पूर्वीच्या वार्ड प्रमाणे चार वार्डात विभागणी झालेली आहे.या वार्डात ५ फुटाच्या गल्ल्या असून कचरा उचलला जात नाही आजही किमान १०० ट्रक कचरा पडलेला आहे. तसेच रस्त्याच्या कडेला अनेक टपऱ्या टाकलेल्या आहेत अधिकारी कोणीही लक्ष देत नाही. त्वरीत साचलेला कचरा उचलण्याच्या सूचना कराव्यात.

सौ.हर्षमाला पाटणी : घंटागाडीची सोय झालेली नाही.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :माझ्या माहिती प्रमाणे शहरातील कचरा १ मधून ३ मध्ये, व ३ मधील परत ४ मध्ये जातो. शहराच्या बाहेर कचरा जात नाही. शहर स्वच्छ करण्यासाठी आठ दिवसात नियोजन करावे जेथे कचरा जास्त असतो तेथे कर्मचारी कमी असतात ही परीस्थिती आहे.कर्मचारी आहे तेच आहे फक्त कामाची पध्दत बदलली आहे. कर्मचाऱ्याच्या बदल्या केल्या ते नाराज असून प्रशासनास जाणून बुजून अडचणीत आणन्याचा प्रयत्न करीत आहे.

श्री.कोकाटे काशिनाथ : महत्वाच्या विषयावर चर्चा होत असतांना एकही विभागा प्रमुख येथे नाही. नूसती चर्चा करणार आहात का ?मा.आयुक्त उत्तर देत असतील तर सभा चालू ठेवावी.

श्री.रेणूकादास वैद्य :जे अधिकारी बाहेर गेलेले आहे उपस्थित नाही त्यांचा एक दिवसाचा पगार कपात करावा.

श्री.संजय सिरसाट :अधिकारी वर्ग चहा घेण्यासाठी बाहेर गेलेले आहे महत्वाच्या विषयावरचर्चा होत असतांना त्यांनी परवानगी घेणे आवशक होते मा.आयुक्त सभागृहात उपस्थित आहे आता या नंतर जे अधिकारी सभागृहात येतील त्यांचा एक दिवसाचापगार कपात करण्यात यावा अशी विनंती आहे.

मा.महापौर : सर्व अधिकारी यांना सूचना करण्यात येते की. यापूढे सभा चालू असतांना परवानगी शिवाय बाहेर जावू नये.

श्री.संजय सिरसाट :चर्चा चालू असतांना नेहमीच अधिकारी विना परवानगीने बाहेर जातात म्हणून आम्ही सर्व पक्षीय स.सदस्य ०५ मिनिटासाठी हे सभागृह सोडून बाहेर जात आहे.

(याच वेळी संबधित अधिकाऱ्यावरकार्यवाही झाली पाहिजे म्हणून बरेच स.सदस्य सभागृहाच्या बाहेर जातात.)

श्री.अब्दुल रशिद खॉन :कोरम नाही सभा तहकूब करण्यात यावी.

श्री.बैनाडे कवरसिंग :सभा सूरू होवून दोन तास होत आहे बाथरूमला वगैरे जावे लागते आज कोणतीही कार्यवाही न करता सक्त ताकीद देण्यात यावी.

(०५ मिनिटाच्या अवधीनंतर पून्हा सर्व सदस्य सभागृहात येवून बसतात.)

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : कचऱ्याच्यासंदर्भात चर्चा चालू असतांना अधिकाऱ्याचे किती लक्ष आहे हे दिसून येते . यांचा अर्थ अधिकारी कर्मचारी महानगरपालिकेकडे कमी नाही नियोजनाची आवश्यकता आहे.जी मानसिकता निर्माण झालेली आहे ती बदलावयास पाहिजे.यासाठी शहर स्वच्छ करण्यासाठी तारीख २० ते २८ पर्यत स्वच्छता मोहीम राबवावी यात नागरीकांचाही सहभाग असावा.नागरीक सूध्दा कचरा दुसऱ्याच्या घरासमोर आणून टाकतात.एक दुसऱ्या वार्डात कचरा टाकण्यात येवू नये याची जबाबदारी घेण्यात यावी.वार्डवाईज नियोजन करावे महानगरपालिकेच्या इमारतीतील घाण काढावी नंतर हे शहर स्वच्छ करावे. महापालिकेच्या इमारतीपासून अगोदर सुरूवात करावी.

श्री.अजीज जाहागीरदार :माझा वार्ड पूर्वी झोन क्र ६ मधे येत होता. त्यात बदल होवून मालखरे येथील इमारतीमधे शिफ्ट केलेला आहे १० ते १२ वार्ड हे पूर्वीच्या झोन क्र ६ पासून जवळच्या अंतरावर आहे या वार्डात जवळपास ९० हजार ते १ लक्ष लोकसंखया येते.चार वार्डसाठी मालखरे इमारतीमधे कार्यालय केले असे वाटते. तरी ते कार्यालय बंद करून झोन क्र ६ मधे शिफ्ट करावे जेणे करून प्रत्येक वार्डातील नागरीकांना कर भरण्यासाठी जवळ पडेल. मालखरे इमारत ही काही वार्डापासून १० कि.मी. दूर आहे. अशा वार्डात सफाई साठी मजूर वेळेवर येत नाही त्यांचा जाण्या येण्यात जास्त वेळ जात आहे. याची दखल घेण्यात यावी.

सौ. बोरमणीकर कला : या शहराची लोकसंखया तसेच नवीन वार्ड रचना यामूळे महानगरपालिकेवर मोठया प्रमाणात कामाचा व्याप वाढलेला आहे.त्यातच मा.आयुक्त हे नवीन असून नवीन वार्ड तसेच नवीन स.सदस्य यामूळे ही परीस्थिती निर्माण झालेली आहे. स्वच्छता व साफसफाईसाठी नागरिकांचा सुध्दा सहभाग असावा असे माझे मत आहे.जास्तीत जास्त स्वच्छता ठेवण्यासाठी नागरीकाचा सहभाग असावा त्यासाठी त्या त्या वार्डातील नगरसेवकांनी या संबधी प्रयत्न करणे आवश्यक आहे.माझ्या वार्डात मी उपक्रम सूरू केला आहे, मी माझा अनुभव सांगत आहे. नागरीक असंख्य प्रश्न विचारत असतात.हा उपक्रम चांगला आहे परंतू महानगरपालिकेला आम्ही स्वच्छता कर देतो तर एक रूपया दररोज का म्हणून दयायचा असे विचारत असतात .या बाबत आपण खुलासा करावा व नागरीकांचे समाधान होईल असे उत्तर देण्यात यावे.

सौ.पूष्पा शिंदे :जयभवानी नगर वार्डात शाळा असून तेथे एकच शिक्षक आहे. आणखी शिक्षक वाढविण्याची आवश्यकता आहे.

मा.महापौर : संबधीत अधिकारी यांनी दखल घ्यावी.

डॉ.भागवत कराड : हे शहर सुदंर,स्वच्छ व हरित व ऐतिहासिक शहर आहे. तत्कालीन आयुक्त श्री भोगे साहेब यांनी घोषणा केली होती की, कचरा दाखवा व १००० /-रूपये बक्षीस मिळवा.तशी परीस्थिती का येत नाही. शहरात एक ही कचरा कुंडी अशी नाही की तेथे कचराच नाही.अनेक कर्मचाऱ्याच्या बदल्या केल्या धाडसी निर्णय आपण घेतले परंतू बदल्या केल्यानंतर किती कर्मचारी कामावर गेलेले आहे हे बघण्याचे काम संबधित अधिकाऱ्याचे आहे.प्रत्येक वार्डातील नगरसेवक व नागरीकांची तक्रार आहे की कचरा उचलला जात नाही याचाच अर्थ साफसफाई होत नाही.पूर्वीची पध्दत चालू करावी दोन वेळेस कचरा उचलण्यासाठी गाडी येत असे, वाहन चालक कर्मचारी कमी असेल तर जे आहे त्यांना जास्तीच्याकामाचा मोबदला देवून दोन वेळेस कचरा उचलण्याची कार्यवाही करण्यात यावी.सुरत पॅटर्न मधे काही कर्मचारी घेतले ते आता कायम झालेले आहे.असे असतांना सुध्दा कचऱ्याचे ढिगार वार्डात पडलेले दिसून येत आहे.कचरा उचलण्याची आवशकता आहे जर कचरा उचलला नाही तर या शहरातील नागरीकांना संसर्गजन्य रोग होतील. हे शहर ऐतिहासीक शहर आहे यासाठी जातीने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. सर्व कचरा नारेगाव येथे टाकला जातो. तेथे खत निर्माण करण्याचा कारखाना होता तो सुध्दा बंद पडलेला आहे.नारेगाव येथील कचरा डेपो इतरत्र ठिकाणी स्थलांतरीत करणार होतो, परंतू ती सूध्दा कार्यवाही करण्यात आलेली नाही इतर काही कामे झाली नाही तरी चालेल परंतू कचरा उचलण्याची कार्यवाही झाली पाहिजे .कचरा उचलण्यासाठी नियोजन करण्याची गरज आहे हे शहर स्वच्छ शहर सुंदर शहर करण्याची गरज आहे.

श्री.नासेर याहीया : माझा वार्ड हा खामनगदी लगत आहे. यापूर्वी मोठ्या स्वरूपात पाऊस झाला होता ४-५ गल्ल्यामध्ये पाणी आले होते. या भागात मा.आयुक्त व इतर अधिकारी वर्ग यांनी प्रत्यक्ष भेट सुध्दा दिली. आजही त्या गल्ल्यामध्ये पाणी साचलेले आहे. काही रेखाकंनातील रस्ते खराब झाले असून रस्त्यावर पाणी साचते. व कचराही मोठ्या प्रमाणात पडलेला आहे. रस्ते, खूल्या जागांचा विकास झालेला नाही. स्वच्छता नाही. आरोग्यास घातक आहे. याची दखल घेतली जात नाही.

श्री.सय्यद खुसरो : माझ्या वार्डात खडकेश्वर भागात साफसफाईसाठी मजूर नाही तसेच कचरा भरण्यासाठी गाड्या नाही. श्रावणचा महिना असून लोक पूजेसाठी मंदीरात येतात, मंदिराच्या बाजूला मोठ्या प्रमाणात कचरा आहे. कोणी अधिकारी लक्ष देत नाही. सदर ठिकाणचा कचरा ताबडतोब उचलण्यात यावा. तसेच मस्जिदच्या बाजूलाही मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला आहे. याची दखल घेण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान मामु : माझ्या माहितीप्रमाणे एकूण १५०० मजूर आहेत. कचरा उचलल्या जात नाही. गाडीवर मजूर कर्मचारी कमी पडतात. १०३८ मजूर झोनला काम करतात उर्वरीत मजूर हे झोन व कार्यालयात क्लर्कचे काम करीत आहे. याबाबत ॲक्शन घेण्यात यावी. ४६२ मजूर हे मुख्य कार्यालय व झोनमध्ये कार्यालयात काम करतात, जे मजूर आहे, त्यांचेकडून मजूराचेच काम घेतले तरच साफसफाई होईल. १०००/- देवून दूसरे लोक काम करतात. एकाच घरातील ४ लोक काम करतात. मजूरांना जो ड्रेस दिला जातो, तो परीधान करीत नाही. मा.आयुक्त यांनी त्या मजूरावर कार्यवाही करावी. त्यास कोणीही हस्तक्षेप करू नये.

मा.महापौर : मजूर म्हणून ज्याची नियूक्ती आहे, त्यांचेकडून मजूर म्हणूनच काम करून घेण्यात यावे. दूसरे कूठलेही काम त्या कर्मचाऱ्यांना देण्यात येवू नये.

श्री.वसंत नरवडे : औरंगाबाद शहरात फ्ल्यु सारख्या व्हायरसची सुरूवात झालेली आहे. अनेक घरातील लोक आजारी आहेत. महापालिकेकडे असलेले बी.एच.सी. पावडर ही कमी दर्जाची आहे. याची स्वत: पाहणी करून घ्यावी. जे वार्ड कार्यालय स्थापन झाले, त्यांना ताबडतोब जागा उपलब्ध करून द्याव्यात जेणे करून तेथे जावून स.सदस्यांना मागणी करता येईल. कचरा उचलण्यास गाड्या कमी असेल तर खरेदी करण्याची कार्यवाही करावी व कचऱ्या बद्दल कोणतीही तक्रार यापुढे येणार नाही, याची दखल घ्यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : नविन वाहने खरेदी करावी, प्रत्येक झोनला दोन गाड्या देण्यात याव्यात. जेथे लहान गल्ल्या आहे, त्यासाठी लहान गाड्या खरेदी कराव्या व शहरातील सध्याची परिस्थिती पाहता एक धडक मोहीम राबवून सर्वच ठिकाणचा कचरा उचलण्याची कार्यवाही करावी.

श्री.संजय जगताप : प्रभाग अ चे कार्यालय मुख्य कार्यालयात शिफ्ट करावे. सध्या हे कार्यालय डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटरच्या बाजूला जे वस्तीगृह आहे, तेथे आहे. त्यामूळे अनेक लोक नाराज आहे, तसेच कार्यालयात जे शिपाई म्हणून काम करतात त्यांना गणवेष देण्यात यावा व ते परीधान करण्याची सक्ती करण्यात यावी.

मा.महापौर : सध्या कचऱ्याच्या संदर्भात चर्चा चालू आहे, वार्ड कार्यालय बदलण्याच्या संदर्भात मा.आयुक्त यांचेशी चर्चा करून सर्वच वार्ड कार्यालयाचा विचार केला जाईल.

श्री.प्रकाश अत्तरदे : महापालिकेच्या ज्या इमारती आहेत, त्या इमारती लगत जी मोठमोठी झाडे आहे, त्या झाडाच्या मुळ्या मूळे इमारत पडू शकते. करीता ती झाडे काढून टाकण्याचे आदेश करावेत.

श्री.संजय केनेकर : कचऱ्याची गाडीही व्यवस्थित भरल्या जात नाही. अर्धा कचरा हा रस्त्यावर पडतो. मा.आयुक्त यांनी पाहणी केल्यास परिस्थिती दिसून येईल.

श्रीमती खान मेहरून्नीसा : अे-१ चे अधिकार झोनला देण्यात यावे, टेंडरही काढण्याचे अधिकार देण्यात यावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : जोपर्यंत कर्मचारी गणवेष परीधान करणार नाही, त्यांनी ओळखपत्र लावत नाही तोपर्यंत कचरा उचलला जाणार नाही.

श्री.संजय शिरसाट : या महापालिकेस आयुक्त नविन आले व सर्वांच्या आशा उंचावल्या की, आता सर्वांना शिस्त लागेल व कामांना गती येईल. सर्व पदाधिकारी व सर्वसाधारण सभेत सुध्दा चर्चा झाली की, अनेक कर्मचारी हे अनेक वर्षापासून एकाच विभागात काम करतात. काहींची तर मक्तेदारी झाली होती. माझ्या शिवाय हा विभाग चालणारच नाही. ह्या बदल्या करीत असतांना कोणीही हस्तक्षेप करणार नाही किंवा बाजू घेणार नाही म्हणून मा.आयुक्त यांनी बदल्या करण्याची मोहीम हाती घेतली. महापालिकेचा चेहरा मोहरा बदलायचा, वेगळे वळण लावायचे म्हणून आता बदल्या कशा करायच्या यावर विचार विनिमय प्रशासनात झाले. अधिकारी बदल्याच्या संदर्भाने गूंतलेले आहे. रेकॉर्ड तपासतात, म्हणून त्या मधल्या आठ दिवसाच्या काळात कोणत्याही अधिकाऱ्यांना त्रास दिला नाही. बदल्या करीत असतांना काही गोष्टीचे भान ठेवलेच नाही. कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या हे सत्य असले तरी कचरा उचलला जात नाही. म्हणून सर्वांनी मुद्दे मांडले. झोन क्र.६ चा कर्मचारी नारेगांव भागात दिला असेल व तेथील कर्मचारी दूसरीकडे नियूक्त झाला तर त्याचे नांव सूध्दा झोन अधिकाऱ्यांना माहित नाही. जे नविन कर्मचारी ज्या

ठिकाणी गेले, त्यांना कोठून कूठपर्यंत सफाई करायची हेच माहित नाही. १५०-२०० मजूर यांच्या नियूक्त्या जेथे झाल्या तेथे न जाता, ते कर्मचारी या महानगरपालिकेमध्ये नेतेगीरी करतात. झोनवर न जाता ते पगार घेत असत. बदल्या केल्यानंतर ६०० कर्मचारी कामावर हजरच झाले नाही ही बाब निदर्शनास आली. काही कर्मचारी यांनी ५० रू. रोजाप्रमाणे इतर माणसे सफाई साठी ठेवली. ते स्वत: सफाई न करता, दूसऱ्या व्यक्तीकडून सफाई करून घेतात. नारेगांवचा कर्मचारी भडकलगेट भागात सफाईसाठी दिला. सकाळी ५.३० वाजता सफाई कामगारांनी हजर रहावे, अशी प्रथा आहे. जर त्या कर्मचाऱ्यास ५.३० वाजता कामावर हजर राहायचे तर त्यांनी किती वाजता उठले पाहीजे व कामावर यावे. याचा विचार सुध्दा होणे आवश्यक होते. काहींनी तक्रार केली की, जे पूर्वी कर्मचारी जेथे होते, तेथेच द्यावे. प्रत्येक कर्मचाऱ्यांना ओळखपत्र द्यावे, म्हणून मा.आयुक्त यांना सूचना केलेल्या आहे. झोनचे कर्मचारी बदलून दिले. वार्ड अधिकारी यांना त्यांचे नांवे माहित नाही त्यामूळे अनुपस्थितीचे प्रमाण वाढलेले आहे. ४०० कर्मचारी याचा गॅप व बदल्या झालेल्या यामूळे शहरात कचरा साचत आहे. अनुकंपा प्रकरणाचे ३७ कर्मचारी सेवेत कायम केले. अगोदर त्यांना काम पाहीजे होते, परंतू कामावर घेतल्यावर मी, झाडू मारणार नाही, अशी भावना त्यांची झाली. झोन क्र.४ ला २० कर्मचारी बसून होते. मी झाडू मारण्याचे काम करणार नाही, म्हणून झोन अधिकारी यांना सांगितले. आज ३७ कर्मचारीही ते कामावर नाहीत म्हणून हा परीणाम झालेला आहे. अस्थापना विभागात १८ कर्मचाऱ्यांना मजूरा ऐवजी शिपाई पदाच्या ऑर्डर देण्यात आल्या. ३७ कर्मचारी व हे १८ कर्मचारी सफाई करण्यातून वगळले. बाद झाले. ही बाब मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणून दिली. दूसऱ्या दिवशी त्या १८ शिपायांना मजूराची ऑर्डर दिली पून्हा ते त्यांचे जागेवर गेले व आम्हाला शिपायाची ऑर्डर होती, आता मजूर म्हणून दिली आम्ही काम करणार नाही. आमच्या लिडर लोकांना बोलू त्यानंतरच मजुराचे काम करू. यास जबाबदार कोण हे शोधले पाहीजे. नगरसेवक जबाबदार नाही. २०००-३०००/- रू. घेवून मजूराचा शिपाई होत असेल तर त्या अधिकाऱ्यांना निलंबीत केले पाहीजे ही माझी मागणी आहे. वार्ड अधिकारी व वार्ड इंजिनिअर या दोघांना असे वाटते की, मी मोठा म्हणून वार्डातील काही कामे होत नाही. हे सर्व होते, उघड्या डोळ्यांनी पाहतो आहे. आजही २५-३०% कर्मचारी सफाईच्या कामास अनुपस्थित राहतात. या शहराचा कचरा न उचलण्यास जबाबदार कोण प्रशासनाने दखल घेतली पाहीजे. इतर शहरात ज्याप्रमाणे रोगराई निर्माण झाली ती या शहरात होवू नये. मा.आयुक्त यांनी सुध्दा तोंडी सूचना दिल्या की, जिथल्या तेथे काम करावे.

श्री.संजय जगताप : सत्ताधारी पक्षांनी बदल्या केल्या आयुक्तांना दोषी ठरवू नये. जे लोक जवळचे आहे, त्यांचे बदल्या नाही.

श्री.संजय केनेकर : हा सर्व जनतेचा प्रश्न आहे. कचऱ्याच्या संदर्भात विरोध नव्हता तर कसे बाहेर गेलात.

श्री.संजय शिरसाट : ही जी परिस्थिती निर्माण झाली यास प्रशासनातील अधिकारी जबाबदार आहे, हे माझे ठाम मत आहे. मजूराचे आदेश देण्या ऐवजी शिपाई म्हणून नियूक्ती केली त्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी तसेच ज्या सफाई मजूरांना ज्या भागाची माहिती होते ते तेथे काम करीत होते तेथे त्यांची बदली करण्यात यावी.

मा.महापौर : कचरा तात्काळ कसा उचलता येईल व हे शहर स्वच्छ कसे होईल याबाबत खुलासा करावा.

मा.आयुक्त : खुलासा करीत आहे, त्यामूळे आपल्या ज्या शंका आहे, त्या दूर होतील. मागच्या सर्वसाधारण सभेत शहराचे लोक संख्येनुसार ६ वार्ड कार्यालय करण्याचा प्रस्ताव आपण मंजूर केला. त्यानुसार वार्ड कार्यालयाची स्थापना झाली. पूर्वी वार्ड कमेटी आणि झोन ऑफिस वेगवेगळे कामकाज होत, समन्वय नव्हता. वार्ड कार्यालय करण्याचे शासन धोरणानुसार जी जनतेची लहान कामे आहेत, ती वार्ड कार्यालयात व्हावी. वार्ड रचनेनुसार कर्मचारी,अधिकारी यांचे नियूक्त्या केल्या. यातील ९०% लोक काम करतात १०% काम करीत नाही हे ठाम मत झाल्यानंतर काही कर्मचारी फारच वर्षापासून एकाच जागेवर आहे. हे सर्व बदलण्यासाठी नगरसेवकाची मागणी होती सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा झालेली होती. माझे पण मत झाले. यामूळे सर्व कर्मचारी/अधिकारी यांना सर्व विभागाचा काम करण्याचा अनुभव मिळतो. ६ वार्ड कार्यालय तयार केले, जे कर्मचारी जास्त दिवसापासून एकाच विभागात काम करतात. त्यांचे व सर्वच कर्मचारी एकदमच त्या विभागातून काढल्यास त्या विभागास अडचण येवू नये. १००% बदल्या करता येत नाही हे धोरण ठरवूनच हे काम केलेले आहे. झोन कार्यालय असतांना एक वार्ड मध्ये ३४ मजूर होते. एक वार्डमध्ये एकच व्यक्ती होते. सर्वच वार्डांना सारखा न्याय देण्याचे ठरले काही वार्डाची परिस्थिती वेगळी असू शकते. मार्केट असते, कचरा जास्त असतो. वरदळ जास्त असते. ७-८ वार्ड असे होते की, तेथे ७-८ दिवसातून एक वेळेस गाडी फिरत असते. प्रत्येक वार्डातील कचरा हा दररोज उचललाच पाहीजे. पूर्वीच्या झोन वार्ड नुसार ८०% भाग हा वार्ड मध्ये आलेला आहे. २०% भाग दूसऱ्या वार्डात समाविष्ट झालेला आहे. जी काही अडचण येत आहे. त्यात २-३ कारणे आहे. यासाठी नियोजन करावे लागेल. काही लोकांच्या बदल्या केल्या आहे. घंटा गाडीद्वारे कचरा उचलतो. ओपन स्पेस मध्ये टाकला जातो, त्यानंतर गाडी येते, गाडी येईपर्यंत कचरा तसाच पडून राहतो हे माझ्या लक्षात आहे, त्याबाबत नियोजन करीत आहे. कचऱ्याची गाडीचालक यांना एक प्रकारची बॅग देत आहे, तो कचरा त्या बॅगमध्ये पडेल. कचरा विखुरलेला किंवा ओपन स्पेसमध्ये दिसून येणार नाही, बांधून ठेवणार. मजूर कमी लागतील पैसे जास्त खर्च होतील. एका वार्डमध्ये प्रयत्न करीत आहे. सफाई होणे गरजेचे आहे. आरोग्यास धोका असतो याशी मी,सहमत आहे. २-३ वार्ड ऑफिसर मनापासून काम करीत आहे. त्यांचे मनापासून अभिनंदन. नागरीकांचेही सहकार्य लागेल. कचरा हा ठराविक वेळेच्या पूर्वी जमा झाला तर वेळोवेळी कचरा दिसून येणार नाही. पूर्वी ७४ ट्रीप कचरा उचलला जात असे, आता ८० ट्रिप कचरा उचलला जातो. नागरीकांमध्ये परीवर्तन करण्याची गरज आहे. आपले सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. मजूर कर्मचारी हे पूर्वी वेगळे काम करीत असे त्यामूळे सफाईच्या कामगारांची उपस्थिती कमी दिसून येत असे. एखादा मजूर चांगला असेल, शिक्षणाचा आदर मी करतो असे वेगळे काम देतांना ज्येष्ठता व शिक्षण महत्वाचे आहे, परंतू यापूर्वी तसे होत नसे. झोन मध्ये मजूर यापूर्वी देण्यात आले, परंतू त्यांना काहींना जवान तर काहींना वसूलीसाठी दिले. वसंतभूवन येथे १८ कर्मचारी काम करीत होते. त्यांनी २४ % वसूली केली फायदा काहीच झाला नाही. मुळात ज्याची मजूर म्हणून नेमणूक आहे. त्यांनी मजूरांचेच काम करावे. या संदर्भात माहिती घेतो. महापालिकेच्या नियमाप्रमाणे काहींना प्रमोशन दिले जाईल. त्यानंतर त्यांनी त्याप्रमाणे काम करावे. परंतू काही तरूण कर्मचारी आहेत, कुणाच्या ओळखीने क्लर्कचे काम करीत आहे व त्याच्यापेक्षा ज्येष्ट कर्मचारी मजूराचे काम करीत असेल तर वाव दिला जाणार नाही. अनुकंपा बाबत

४-५ वर्षा पासून प्रकरण प्रलंबीत होते. मा.महापौर यांनी कार्योत्तर मंजूरीचे आश्वासन दिल्यानंतर त्या कर्मचाऱ्यांना ऑर्डर देण्यात आल्या. अनुकंपा धरतीवर जे कर्मचारी घेतले, त्यांचे शिक्षणाचा पण मी सन्मान करतो त्यांचे प्रमाणेच इतरही काही कर्मचारी पात्रता धारण करतात, जो मेरीटमध्ये येईल त्याचा विचार केला जाईल. या कर्मचाऱ्यांनी काम केले नाही तर नियमानुसार कार्यवाही होईलच आता सध्या अनुकंपा धरतीवर नियुक्त केलेले कर्मचारी मजुरांचे काम करीत आहे. ज्या कर्मचाऱ्यांना मजूराचे शिपाई म्हणून नियुक्त्या केल्या त्या ऑर्डर त्याच दिवशी बदलल्या यापैकी १२ कर्मचारी कामावर नाही. मजूरांचे काम दिले तर ते करावे लागेल नसता वेतन दिले जाणार नाही. दूसरा प्रश्न की, वार्ड कार्यालय कूठे असावे. याबाबत त्या त्या वार्ड कमिटीतील जे स.सदस्य आहे, यांनी ठरवावे. परंतू जेथे वार्ड ऑफिस स्थायी करणार ती इमारत महापालिकेची असावयास पाहीजे. ओळखपत्राच्या संदर्भात यापूर्वी सर्वांना ओळखपत्र दिलेले आहे. जे नविन कर्मचारी आहेत, त्यांना दिले जाईल. ज्याचे गहाळ झाले त्यांचेकडून १०/- रू.आकारून परत दिले जाईल. ८-१० दिवसात ही कार्यवाही पूर्ण होईल. ०१ तारखेच्या नंतर जो कर्मचारी ओळखपत्र लावणार नाही, त्यांना दंडात्मक कार्यवाही होईल, तसेच सर्व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना गणवेश दिले जातात. पून्हा तसे आदेशित करून कार्यवाही होईल. वर्ग-४ चे कार्यालयीन कर्मचारी यांनी गणवेषातच कार्यालयात येणे आवश्यक आहे. यासाठी १५-२० दिवस लागतील. ज्या अडचणी आपण मांडल्या त्यात सुधारणा होईल. जे कर्मचारी मजूर म्हणून बदल्या केल्या ते काम करण्यास तयार नसतील किंवा त्यांचे जागेवर दूसरेच लोक काम करीत असतील या बाबत आपण सर्वांनी प्रशासनाच्या बरोबर रहावे. कार्यवाही करता येईल व एकदा सवय झाल्यानंतर ते सर्व कर्मचारी नेमून दिलेले काम करतील यात शंका नाही. कर्मचाऱ्यांच्या नांवावर जे कूणी काम करीत असेल, त्यांना नोकरीवर घेण्याचा प्रयत्न करू व जो मुळात कर्मचारी आहे, त्यांना नौकरी वरून काढण्याची कार्यवाही होईल. असे प्रकरण आपल्या सर्वांच्या अधिकारात शासनाकडे पाठवून मान्यता घेवू. कार्यवाही करू. सफाई बद्दल प्रशासन दक्षता घेत आहे, आपणां सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

श्रीमती अलका पाटील : वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना सर्व सवलती दिल्या जातात आताच खूलासा झाला, परंतू दिवाळी हा हिंदु धर्माचा सण असतो, कर्मचाऱ्यांना बोनस देण्यात यावा.

मा.महापौर : मा.आयुक्तांनी खूलासा केला सर्वांचे समाधान झाले असेलच. तरी पण अशी सूचना देण्यात येते की, साफसफाई बाबत कचरा जास्त साचलेला आहे, असे स.सदस्यांनी मत व्यक्त केले. ठेकेदारी पध्दतीने मजूर लावून सफाई करता येईल का? तसे करावे. व २५ ते ०३ तारखेपर्यंत पूर्ण साफसफाई मोहीम राबविण्यात यावी. शहर स्वच्छ करावे. आजची सभा ही १५ मिनीटासाठी तहकूब करण्यांत येते. (सभा सायंकाळी ६.०० वा.तहकूब सभेला सुरूवात ६.४० वाजता)

मा.महापौर : प्रशासकीय अधिकारी यांनी सुजाता हौसींग सोसायटीतील अतिक्रमणाच्या संदर्भात तसेच गट क्र ३७ च्या संदर्भात खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी : सर्व्हे नं.३७ पी मधील क्षेत्र १२३५ चौ.मी. मंजूर विकास योजनेच्या शाळा व क्रिडांगण या आरक्षणासाठी जमीन संपादन केल्या बाबतचेपत्र मालमत्ता विभागाकडून या विभागास प्राप्त झालेले आहे. पाहणी केली असता सद्य स्थितीत तेथे आठ कुटूंब अस्तित्वात आहे.या जागेचे सिमांकन व मालकी हक्काचे कागदपत्र हस्तगत करून या जागेच्या संदर्भात कार्यवाही ही नोटीस तामील करून करण्यात

येत आहे.सध्या पावसाळा असल्यामूळे या प्रकरणी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

श्री.बारवाल गजानन : सदर जागा महानगरपालिकेच्या मालकीची असून आतापर्यत का कार्यवाही केलेली नाही या सर्व बाबतीत संबधित अधिकारी यांना माहिती होती तरी सुध्दा कार्यवाही केलेली नाही..

श्री.मनमोहनसिंग ओबेराय: महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण केले विक्री करणारे तेथे नाही तेथे गरीब कुटूंब राहत असून पावसाळयाच्या दिवसामधे महाराष्ट्र शासन नियमानूसार काढू शकत नाही. इतरही महानगरपालिकेच्या शहरातील जागेवर अतिक्रमण होत आहे.ओपन स्पेसच्या जागा देवू शकत नाही त्याही दिल्या जात आहे.ओपनस्पेसच्या जागा हया नियमानूसार १० टक्केच्या वर देता येत नाही.या सर्व संचिका या सभागृहात चर्चेसाठी आणाव्यात.

श्री.रेणूकादास वैद्य : मालमत्ता विभागाने ७ जूलैला प्रशासकीय विभागास पत्र दिलेले अदयाप कार्यवाही झालेली नाही.शिवाय त्या जागेला महानगरपालिकेने कर लावलेला आहे.. हे चूकीचे आहे.

श्री.बारवाल गजानन : महानगरपालिकेची जागा आहे तात्काळ ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी.

श्री.अब्दुल रशिद खान : खुली जागा नाही .महानगरपालिकेची एक एकर जागा आहे. मालकी हक्काबाबत वाद आहे. तसेच पावसाळ्याचे दिवस आहे.

सौ.लता दलाल : १५ लक्ष रूपये खर्च करून महानगरपालिकेने ही जागा भूसंपादन केलेली आहे त्या जागेवर काही लोक प्लॉटींग करून अनधिकृतपणे राहत आहे. त्यात काही महानगरपालिकेचे कर्मचारी सुध्दा आहे.ओपनस्पेस नाही ती महानगरपालिकेने भुसंपादन केलेली आहे ती महानगरपालिकेचीच असणार आहे.सभागृहात दिशाभूल करण्यात येत आहे. प्रशासकीय अधिकारी यांनी सुध्दा अशी चुकीची माहिती देण्यात येवू नये.याची प्रशासनाने नोंद घ्यावी.भूसंपादीत केलेल्या जागेवर कुणी अतिक्रमण करून घरे करीत असेल तर २४ तासाची नोटीस देवून कार्यवाही करता येते.

श्री.अब्दूल रशिद खॉन :सभागृहात दिशाभूल होत आहे १५ लक्ष देवून जागा खरेदी केली नाही. संबधित श्री. परदेशी नावाने व्यक्ती यांनी ती जागा दिलेली आहे.१५ लक्ष देवून खरेदी केलेली जागा ही धोबी घाटची जागा होती. या संबधी चौकशी करण्यात यावी त्यानंतर कार्यवाही व्हावी.

श्री.अजीज जागीरदार : जे कूटूंब तेथे बसलेले आहे त्यांनी रजिस्ट्री करून घेतलेली आहे. तर ती जागा महानगरपालिकेची होवू शकते का.

श्री.बारवाल गजानन :यावर चर्चा न करता प्रशासनाने चौकशी करून कार्यवाही करावी.

मा.महापौर : मा.आयुक्त यांनी ८ दिवसाच्या आत चौकशी करून कार्यवाही करावी.

श्री.दिलीप गायकवाड :श्रेयनगर भागात उदयानच्या जागेवर एका बिल्डरांने इमारत बांधलेली आहे या बाबत प्रशासनाने माहिती दयावी.

मा.महापौर : स.सदस्य श्री. सुरे यांनी जो मुद्या उपस्थित केला त्या संदर्भात अगोदर माहिती घेवू नंतर या विषयावर बोलावे.

प्रशासकीय अधि. : या संदर्भात संचिका त्या विभागाकडून मागविली त्यामधे सुजाता गृहनिर्माण संस्थेस जा.क्र. २०९५/९१ नुसार दिनांक १९.९.९१ ला तत्वत:मान्यता देण्यात आलेली होती.त्यानंतर मालकी हक्काबाबत वाद निर्माण होवून १९२/६ मधील क्षेत्र हे दादाराव म्हस्के यांचे हक्कातील वादग्रस्त क्षेत्र वगळून सूधारीत रेखांकन प्रस्ताव दाखल करण्यास नगर रचना विभागा मार्फत दिं १२.५.०३ नूसार कळविले आहे.परंतु सदरील संस्थेने अदयाप सुधारीत प्रस्ताव दाखल

केलेला नाही. त्या रेंखाकंनास मान्यता आहे असे गृहीत धरता येणार आहे.संबधित न्यायालयात जो वाद चालू झालेला आहे हा त्यांचा वैयक्तिक बाब ठरते.या रेखांकनाच्या लगत जो २४ मिटर रस्ता गेलेला आहे. नगररचना विभागाने दिलेली माहिती नेमकी रस्त्याची जागा कोणती आहे .सुधारीत प्रस्ताव दाखल करणे बाबत कळविलेले आहे.किती अतिक्रमण येते यांचा बोध होत नसल्यामूळे या विभागास कार्यवाही करता आलेली नाही.

श्री.सिताराम सूरे : जळगाव रोड लगत सूजाता हौसींग सोसायटी आहे. सदर सोसायटी ही अधिकृत की अनाधिकृत आहे याबाबत मला काही माहिती नाही परंतू या सोसायटीचे बेटरमेंन्ट चॉर्जेस भरणा करून घेतले ते कोणत्या अधारे घेतलेले आहे.जळगाव रोड लगत बी ॲण्ड सी विभागाची जागा आहे रहदाराचा रोड आहे असून श्री. रगडे यांनी त्या जागेवर ६ दुकाने बांधलेली आहे.३६ मीटरचा डी.पी रस्ता आहे त्या संदर्भात सुनावणी झालेली आहे.या रस्त्यालगत बीॲण्डसीचा रस्ता असून त्या जागेवर ६ दुकाने अनधिकृत झालेली आहे.एपिल मध्ये हे अतिक्रमण झालेले आहे तेंव्हापासून मी पाठपूरावा करतो आहे कोणत्या बेसवर हे अतिक्रमण झालेले आहे.नागरीकांचा रस्ता बंद करण्याचा संबधितास काय अधिकार आहे. रस्ता किती दिवसात सुरळीत होईल याची माहिती दयावी.

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी या सबंधी जातीने लक्ष घालून ७ दिवसामधे या बाबतीत निर्णय घ्यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :औरंगाबाद शहरामधे असे किती ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे महानगरपालिकेच्या जागेवर किती झालेले आहे व इतर अतिक्रमणे किती यांचा संपूर्ण संर्वे करावा वेळ लागेल परंतू सर्व माहिती समोर येईल.या बाबत योग्य ते निर्णय घेतले जावेत .

श्री.मनमोहनसिंग ओबेराय: महानगरपालिकेच्या जेवढयाही जागा आहेत त्या जागेवरील सर्वे करावा व इतर अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भातही सर्वे करावा माहिती समोर ठेवावी. प्रत्येक वेळेस एक एक प्रकरणाच्या बाबतीत चर्चा करणे बरोबर नाही .

मा.महापौर : महानगरपालिकेच्या जेवढयाही ओपनस्पेस असतील व महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा असतील अशा जागेवर जेथे जेथे अतिक्रमण असतील या संदर्भात प्रशासनाने एक ते दिड महिण्याच्या आत सर्वे करून सविस्तर अहवाल सभागृहासमोर ठेवावा.

श्री.अजीज जागीरदार :खाजगी वाटाघाटी करून काही बीले देण्यात आलेली आहे.या बाबत चौकशी झाली पाहिजे.

मा.महापौर :खाजगी वाटाघाटी करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना आहे.त्यांना अधिकार प्रदान केलेले आहे.

श्री. गायकवाड दिलीप : ज्या अधिकाऱ्यांनी अनाधिकृत बांधकाम केली आहे, त्यांची चौकशी करावी. याची सुध्दा चौकशी करण्यात यावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे :वार्ड क्र ९० मध्ये महानगरपालिकेची जागा असून त्या जागेला संरक्षित भित आहे त्या जागेवर श्री माधवराव घोरपडे यांनी अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केलेला असून या संदर्भात प्रशासनास पत्र दिलेले आहे.त्या ठिकाणी तळमजल्यासाठी खोदकाम चालू असून सदरचे बांधकाम थांबविणार की नाही याचा खूलासा करण्यात यावा.

मा.महापौर : कुठे अनाधिकृत बांधकाम चालू असेल तर ते मा.आयुक्तांनी त्वरीत थांबवावे.

श्री. रेणूकादास वैद्य : बाजारच्या वसूलीच्या बाबतीत दोन चार दिवसापूर्वीच्या वृत्तपत्रात बातम्या छापून आलेल्या आहेत, मालमत्ता संदर्भात हा विषय असून संबधित अधिकाऱ्यावर काही कार्यवाही करण्यात आलेली आहे का.

मा.महापौर :संबधित ठेकेदार किंवा संबधित अधिकारी यांचे बाबतीत काय कार्यवाही केलेली आहे.

उपआयुक्त(म) :आठ ते दहा दिवसापासून शहानूरवाडी बाजार व जाफरगेट बाजार संदर्भात जो ठेका ज्या ठेकेदारांना देण्यात आलेले होते . पैसे न भरल्यामूळे जो काही प्रश्न निर्माण झालेला होता. त्या बाबतीत जाफरगेट बाजारचा ठेकेदारा विरूध्द कालच सिटीचौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केलेला आहे.या प्रकरणात संबधित अधिकारी श्री शिरीष रामटेके व वसुलीचे काम करणारे लिपीक यांना प्रशासनाने आजच निलंबीत केलेले आहे.या संदर्भात दोन्ही अधिकारी कर्मचारी यांचेवर विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. तत्पूर्वी ज्या ठैकेदारानी पैसे भरण्यास विलंब केलेला आहे त्याची मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही सुध्दा सुरू केलेली आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : चिकलठाणा बाजार बाबतीत का कार्यवाही नाही.

उपआयुक्त ,महसूल :सदर ठेकेदाराकडेही २.९९ लक्ष इतकी बाकी आहे त्यास मूदतवाढ देण्यात आलेली होती ती मागे घेण्यात आलेली आहे.वसूल करण्या संदर्भात कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:पीरबाजारचे ठेकेदार यांचाही एक लक्षचा चेक दिलेला आहे तीही वसूली करण्याचीकार्यवाही करावी.

श्री.जगताप संजय : ज्यांना निलंबीत केलेले आहे त्यांचा थोडाफार निष्काळजीपणा झाला असेल त्यांना कारणे दाखवा नोटीस दयावयास पाहिजे होती. संबधित अधिकारी कर्मचारी हे निर्दोष आहे. संबधित जे ठेकेदार आहे त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी

मा.महापौर : मा.प्रशासनाने योग्य कार्यवाही केलेली आहे जर चौकशीमधे ते निर्दोष असतील तर परत कामावर घेतील.

सौ.लता दलाल : माझ्या माहिती प्रमाणे तीन बाजारांचा ठेका देण्यात आलेलाहोता.एकूण ७.६० लक्षमधे ठेका दिलेला होता. ती वसुली करावयास पाहिजे होती ती केलेली नाही हा सर्व प्रकार मार्चच्या पूर्वीचा आहे ज्यांनी ३.८० लक्ष भरावयास पाहिजे होते ते न भरता फक्त १.५० लक्ष भरलेले आहे.या संदर्भात संबधित अधिकारी यांनी प्रशासनास कल्पना दिलेली नव्हती अशी माहिती आहे.आचार संहिता होती म्हणून त्या कालावधीत परस्पर संबधित अधिकारी यांनी करारनामा संपला म्हणून मुदत वाढ दिली असावी.जी कार्यवाही अधिकाऱ्यावर केलेली आहे ती योग्य आहे. यापूढे दुसरे कर्मचारी अधिकारी हे महानगरपालिकेला आर्थिक तोटयात आणणार नाही.या मूळे कर्मचाऱ्याना एक प्रकारचा वचक राहील.तसेच चिकलठाणा येथील बाजाराचा ज्यांना ठेका दिलेला होता त्यांचेकडेही मोठया प्रमाणात थकबाकी आहे या वसूलीच्या बाबतीत संबधीत ठेकेदारावर योग्य ती कार्यवाही करावी. मा.आयुक्तांची कार्यवाही कौतुकास्पद आहे. महानगरपालिकेचे नुकसान टळेल. आजही मोठी थकबाकी आहे, त्या ठेकेदाराची मालमत्ता जप्त करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : चेक दिल्यानंतर लेखा विभागात जमा होतात, त्यानंतर बँकेकडे जाते, तो वटवला गेला नाही, याबाबत मालमत्ता अधिकारी यांना माहिती दिलेली होती का. चौकशी होत असतांना कूणावर अन्याय होवू नये.

श्री.गजानन बारवाल : महानगरपालिकेने पार्कींगसाठी ठेका दिलेला आहे, ती सुध्दा वसूली करण्याची कार्यवाही वेळीच करावी.

श्री.रेणूकादास वैद्य : सिध्दार्थ उद्यान,संत एकनाथ तेथेही असेच चालू आहे. त्यातही मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. कूणाचेही टेंडर अंतिम झालेले नाही. पूर्वीप्रमाणे काम चालू आहे. दूप्पट पैसे आकारले जातात. त्या बाबतीतही चौकशी करावी.

श्रीमती खान मेहरून्नीसा : संबंधित ठेकेदार यांचेवर कार्यवाही करण्यात यावी. अधिकाऱ्यांना दोषी ठरवू नये.

श्रीमती अलका पाटील : ठेकेदारावर कार्यवाही करण्यात यावी. चोर सोडून संन्याशास फाशी कशासाठी, अधिकाऱ्यावर कार्यवाही होवू नये.

मा.महापौर : संबंधित ठेकेदारावर पोलीस गुन्हा दाखल केलेला आहे, आताच प्रशासनाने खूलासा केलेला आहे.

श्री.संजय केनेकर : रोकडा हनुमान कॉलनी ते मोंढा नाका या रस्त्यावर ज्या ट्रक उभ्या असतात त्यासंदर्भात कोणीतरी खाजगी व्यक्ती पैसे जमा करतात. त्या गाड्या महानगर-पालिकेच्या जागेवर उभ्या असतात,आजही वसूली करण्याचे काम चालू आहे.

मा.महापौर : मालमत्ताच्या बाबतीत ज्या काही मालमत्ता, बाजार असेल किंवा पार्कींगच्या जागा असतील नियमानुसार टेंडर दिलेले असतील किंवा राहीलेले असतील ते तात्काळ करण्यात यावे, तसेच पार्कींच्या बाबतीत जो कूणी ठेकेदार ३ रूपया ऐवजी ७ रूपये वसूल करीत असतील तर अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष द्यावे.

श्रीमती अलका पाटील : भडकल गेट भागात महानगरपालिकेची जागा असून त्या जागेवर अतिक्रमण होत आहे, संरक्षित भिंत करण्यात यावी.

मा.महापौर : संबंधित अधिकारी यांनी स.सदस्या यांचे सूचनांची नोंद घ्यावी.

**विषय क्र. ४४/१ :**

दिनांक १७.०६.२००५ आणि दिनांक ०७.०७.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.विनायक पांडे : इतिवृत्त कायम करीत असतांना मागील बैठकीत बेगमपुरा या भागाचे नाव बदलून गोगानाथ बाबा नगर असे नांव करण्यास दुरूस्ती करण्यात येवून मंजूरी देण्यात आलेली होती. ते योग्य प्रकारे आलेले नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : नांव बदलण्याचे प्रस्ताव कमेटीकडे पाठवावे.

श्री.सलीम खान :बेगमपुरा हे नाव ऐतिहासिक बेबीचा मकबऱ्याशी संलग्न आहे,हे नांव बदलण्यात येवू नये.

मा.महापौर : विषय क्र.१ दुरूस्तीसह मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

दिनांक १७.०६.२००५ आणि दिनांक ०७.०७.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दुरूस्तीसह कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र. ४५/२ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील चिकलठाणा व स्टेशनरोड औद्योगिक वसाहतीतील लघु उद्योजक यांनी प्रक्रीयासाठी माल आयात करून लेबर चार्ज बेसीसवर काम करून प्रक्रीया झाल्यावर परत मूळ उद्योगाकडे उक्त प्रक्रीया झालेला माल परत करतात. अशा लघु उद्योजकांसाठी मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.१४७/१२ दि.३.१२.९८ आणि ठराव क्र.१६७/१ दि.१९.१२.९८ नुसार मान्यता दिलेली होती आणि सदरच्या प्रस्तावास शासन निर्णय क्र.एएमसी-१४९८/२००२/प्र.क्र.-२०९/९८/नवि-२४,मंत्रालय,मुंबई-३२ दि.३ मार्च, १९९९ अन्वये शासनाने मान्यता दिलेली आहे.

वरिल शासन निर्णयातील अटी व शर्तींचा अंतर्भाव असलेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या जकात नियम-१६ (अ) या सुविधेअंतर्गत जिल्हा उद्योग केंद्राकडे नोंदणी केलेल्या फक्त मनपा हद्दीतील लघु

उद्योजकाने फक्त प्रक्रीयेअंती निर्यात करतेवेळी देय राहील, अशी तरतूद आहे. त्यानुसार ज्या लघु उद्योजकांनी आर फॉर्म सुविधा मिळणेकरीता अर्ज सादर केलेले आहेत, अशा लघु उद्योजकांना नियमातील अटी-शर्तीचे अधीन राहून ही सुविधा दि.०१.१०.२००३ पासून लागू करण्यात आलेली आहे.

मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, चिकलठाणा, औरंगाबाद यांचे कार्यालयात दि.२२.०६.२००५ रोजी मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद व संघटनेचे पदाधिकारी यांचे समवेत बैठक संपन्न झाली. सदरच्या बैठकीत मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, चिकलठाणा औद्योगिक वसाहत (Massia) व चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर,रेल्वेस्टेशन औद्योगिक वसाहत (CMIA) यांनी सध्याची आर फॉर्म सुविधा जी फक्त लघु उद्योगांसाठी अस्तित्वात आहे, ती सर्व उद्योगांसाठी लागू करण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील प्रक्रीया करणाऱ्या उद्योगांच्या कामाचे स्वरूप पाहता माल प्रक्रीयेसाठी आयात करून तोच माल प्रक्रीयेअंती निर्यात होत असल्याने त्यावर जकात कर आकारणी करणे योग्य होणार नाही. त्यातही जकात आकारणीचे स्वरूप प्रक्रीयेपुरतेच मर्यादीत असणे जरूरीचे आहे. सध्याची आर फॉर्म सुविधा फक्त लघु उद्योजकांनाच लागू असल्याने इतर माध्यम व मोठ्या उद्योगांकडे प्रक्रीयेसाठी आयात होणाऱ्या मालावर १००% जकात कर आकारणी करण्यात येत असल्याने ते स्पर्धेत टिकाव धरू शकत नाहीत.

वरिल बाब लक्षात घेता, सदरची अट रद्द करून सर्व उद्योगांसाठी आर फॉर्म सुविधा दिल्यास प्रक्रीयेसाठी आयात होणाऱ्या मालाच्या प्रमाणात वाढ होईल व पर्यायाने जकात वसुलीत भर पडण्याची शक्यता आहे. त्यासाठी सध्याची आर फॉर्म सुविधा जी फक्त लघु उद्योगांसाठी अस्तित्वात आहे, ती सर्व उद्योगांसाठी लागू करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.महापौर : या बाबतीत प्रशासनाने खूलासा करावा.

उपआयुक्त,महसूल : आजही महानगरपालिकेस जकात करापोटी औद्योगिक वसाहतीपासून ५० ते ५५% उत्पन्न महानगरपालिकेस मिळते. सदर उद्योगांना जकात किंवा इतर बाबतीत नगन्य सवलती दिल्या जातात. सध्या जी.आर. फॉर्मची सुविधा औरंगाबाद महानगरपालिकेचे जकात नियम १९८४ सन २००० मध्ये केलेल्या सुधारणेनुसार जिल्हा उद्योग केंद्रांनी ज्या उद्योगांना लायसन्स दिलेले आहे, अशा उद्योगांना अशा उद्योगांनी महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये आणलेल्या आणि प्रक्रिया केलेल्या सदर नियमामधील उपनियम ब नुसार ज्या मटेरियलमध्ये आकार बदलत नाही. मूळ रूपामध्ये काही फरक पडत नाही, अशा लघु उद्योगांना ही सुविधा लागू आहे, परंतू ही सुविधा बाहेर मटेरियल पाठवतात, त्यासाठी लागू व्हावी,म्हणून सर्वसाधारण सभेने ठराव १९ जानेवारी २००५ रोजी घेतलेला आहे. सदर ठराव शासनाकडे मान्यतेसाठी ७ मार्च २००५ रोजी पाठविण्यात आलेला आहे. परंतू औरंगाबाद हद्दीमध्ये चिकलठाणा वसाहतीमध्ये मोठे उद्योग आहे, ते मोठे उद्योग सुविधा अभावी महानगरपालिकेच्या हद्दी बाहेर जात आहे. कास्मोफिल्मस् हा उद्योग, आर.एल.स्टील हे उद्योग पूर्णत: शिफ्ट झालेले आहे. गरवारे कंपनीचाही काही भाग शिफ्ट झालेले आहे. गरवारे कंपनीचाही काही भाग शिफ्ट झालेला आहे. असे होत राहीले तर महानगरपालिकेचा मुख्य उत्पन्नाचा जो स्त्रोत आहे, तो लोप पावेल. सदर उद्योजकांचे म्हणणे असे आहे की, जो माल प्रक्रीयेसाठी बाहेर जातो, त्यांनाही ही सुविधा द्यावी, अशी मागणी आहे.

श्री.संजय शिरसाट : प्रस्ताव जो आहे तो फक्त प्रक्रिया करून वापस पाठविणे संबंधी आहे. रॉ मटेरियला संबंध येत नाही. जर रबर आले, त्याचे टायर तयार होत असेल तर त्यास उत्पादन म्हणतात. ज्या कंपनीचे नांवे घेतलेली आहे, ती चूकीची आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : नियम क्र. ब काय आहे, खूलासा करावा.

| | |
|---|---|
| मा.महापौर | : माहिती देण्यात यावी. |
| उपआयुक्त महसूल | : औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम १९८४ मध्ये दिनांक १३ जूलै २००० मध्ये झालेल्या सूधारणेनुसार जकात नियम १६ नंतर १६ अ हा नियम समाविष्ट करण्यात आलेला आहे. या नियमामध्ये स्पष्ट असे म्हटले आहे की, प्रक्रियेमध्ये अनुज्ञेय असलेल्या मर्यादे व्यतिरिक्त मालाचा आकार स्थिती व बाह्यस्वरूप यामध्ये कूठलाही बदल होणार नाही. |
| श्री.संजय शिरसाट | : कास्मोफिल्मस्च्या रॉ मटेरियलमध्ये बदल होतो की, नाही तेथे मी, ६ वर्षे काम केलेले आहे, मला माहिती आहे. त्या उद्योजकांना सुविधा दिली पाहीजे. जे ज्यांचा गुणधर्मामध्ये बदल होत नाही. |
| मा.आयुक्त | : कोणताही माल त्यास प्रोसेसिंग म्हणायचे का. मॅनेफॅक्चिरींग म्हणायचे, जर प्रोसेसींगसाठी माल आत आला तर त्यास जकात किती आकारावी हा प्रश्न आहे. हे नियम झाल्यानंतर ते व्यक्ती महानगरपालिकेकडे अर्ज करतील आणि प्रोसेसींग सांगतील. जर महानगरपालिकेस खात्री झाली की, हे प्रोसेसींगमध्ये आहे, तरच सवलत मिळेल, नसता नाही. |
| श्री.संजय शिरसाट | : ज्या कंपनीचे उपआयुक्त यांनी नांवे घेतली त्यात त्यांचा समावेश होतो का. त्या कंपन्या शिफ्ट होत आहे, त्यामूळे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे, असे म्हटले आहे. |
| मा.आयुक्त | : यात आपण एखाद्या ठराविक कंपनीचे नांव टाकत नाही. |
| उपआयुक्त महसूल | : ज्या कंपनीचे नांव घेतलेले आहे, जे उद्योग सुविधा अभावी बाहेर जात आहे, त्या संबंधाने घेतलेले आहे, त्याचा आर फॉर्मशी संबंध आहे किंवा काय ही बाब तपासून पाहिली जाईल. |
| मा.आयुक्त | : ज्या कंपनीचे नांव घेतलेले आहे, ते उद्योग कोणत्यातरी कारणामूळे बाहेर गेलेले असतील. त्यातील काही कारण हे सवलती किंवा महानगरपालिकेच्या जकात सवलतीचेही असतील. ज्या कंपन्या बाहेर गेल्या आहेत, त्यामूळे जकातीचे जवळपास ३ कोटीचे महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे. बाहेर जे उद्योग शिफ्ट झाले, ते महानगरपालिकेमूळेच झाले. असे म्हणता येणार नाही. महानगरपालिकेने ज्या सवलती द्यावयास पाहीजे त्या देता येईल, त्यापेक्षा इतर कारण असेल. |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : या शहरातून बरेचशे उद्योग बाहेर शिफ्ट होत आहे, ही वस्तुस्थिती आहे. ज्यांचेमूळे उत्पन्न मिळते त्यांनी जी मागणी केली, त्याचाही सहानुभूतीपूर्वक विचार होणे आवश्यक आहे. |
| श्री.संजय शिरसाट | : ज्या उद्योजकांना सवलती देणार आहे व ज्या मटेरियलला द्यायच्या, त्यांची नांवे असावी सुधारीत प्रस्ताव सादर करावा. |
| मा.आयुक्त | : ज्या कंपनीला वाटत असेल की, प्रोसेसींगमध्ये बसते ते अर्ज करतील आपल्या रूलनुसार प्रोसेसींगमध्ये बसत असेल तेंव्हा त्यांना देवू प्रत्येकवेळी जी कंपनी अर्ज करतील प्रस्ताव सादर करणे शक्य होणार नाही. ज्यांना आर फॉर्म दिले किंवा देण्यात येतील, त्यांची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात येईल. |
| श्री.भागवत कराड | : काही उद्योग बंद झाले, काही बाहेर शिफ्ट झाले, लहान उद्योगासाठी आर फार्म देण्याची सुविधा चांगली आहे. उशीर लागलेला आहे. यापूर्वीच हा प्रस्ताव यावयास पाहीजे होता, लहान मोठ्या सर्वच कंपन्यांना आर फॉर्मची सुविधा देण्यात यावी. उद्योग वाढतील बेकारांना कामे मिळतील. जशाचा तसा प्रस्ताव मंजूर करावा. |

श्री.अ.रशिद खान मामु : ज्वारी आणली व पीठ तयार करून नेले तसेच लाकूड आणणार नविन वस्तू तयार करणार यासाठी कंट्रोल कूणाचे राहणार आहे. कोणत्या कंपन्या आहे, याची सूध्दा माहिती असावी. प्रस्ताव स्थगित करावा. पूढील बैठकीत सादर करावा. ज्या उद्योजकांनी चूकीचे केल्यास त्यांचेवर ४२० चा गुन्हा दाखल करावा.

श्री.भगवान घडमोडे : ज्या वस्तुवर प्रोसेस होईल, ज्या वस्तु बाहेर जातील आणि प्रोसेस होवून येतील, अशा ॲटमची नांवे नियमावली करतांना घेतली पाहीजे. ज्यात फक्त प्रोसीस करीत असतांना नविन आकार केला, त्याकडे काळजीपूर्वक लक्ष देणे भाग आहे. ज्या ज्या कंपन्यामध्ये प्रोसेसींग होत असेल त्यांना ही सवलत लागू करावी जे जे ॲटम असतील त्याची सभागृहाला माहिती द्यावी.

मा.महापौर : दुरूस्तीसह प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सध्याची आर फॉर्म सुविधा जी फक्त लघु उद्योगांसाठी अस्तित्वात आहे, ती सर्व उद्योगांसाठी लागू करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विभाग नियंत्रक, राज्य परिवहन,औरंगाबाद यांनी शहर बस वाहतूक सेवा तोट्यात चालते व महानगरपालिकेने सदरील सेवा महानगरपालिकेकडे घ्यावी म्हणून अनेकवेळा पत्र व्यवहार केला आहे. दि.११.०२.१९९४ रोजी मा.आयुक्तांनी सहसचिव,नगर विकास विभाग मंत्रालय,मुंबई यांना पत्रान्वये कळविले आहे की, सदरील सेवा महानगरपालिका औरंगाबाद घेऊ इच्छित नाही.

सन २००३ मध्ये इतर महानगरपालिकाकडे या सेवेबाबत विचारणा केला असता खालीलप्रमाणे खुलासा आला आहे.

०१. कोल्हापुर महानगरपालिका ना-नफा-ना-तोटा मध्ये शहर बस वाहतूक चालविते.
०२. बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन हे शहर बस सेवा तोट्यात चालविते.
०३. कल्याण डोंबिवली महानगरपालिका ही सेवा ना-नफा-ना-तोटा मध्ये चालविते.
०४. नाशिक,नागपुर महानगरपालिकेकडे ही सेवा घेतलेली नाही.

दिनांक २३.०२.२००४ व दि.२७.१२.२००४ रोजी मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे दालनात राज्य परिवहन मंडळाचे अधिकारी यांचे सोबत बैठक झाली व शहर बस सेवेबाबत ठोस प्रस्ताव व ती कशी चालते याबाबत विभाग नियंत्रक यांचेकडे पत्र पाठवून माहिती मागितली. त्यांनी खालीलप्रमाणे खुलासा सादर केला.

०१. आगार व कार्यशाळेसाठी ८ एकर जागा लागेल, आगार, बसस्थानक कार्यशाळांसाठी तीन स्वतंत्र इमारती लागतील.
०२. १०० बसेस घ्याव्या लागतील.
०३. प्रति कि.मी.उत्पन्न १०=९१ आहे व खर्च रू.२४.४७ प्रति कि.मी.आहे.
०४. खालीलप्रमाणे अधिकारी व कर्मचारी १०० नियतासाठी नेमावे लागतील.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | आगार व्यवस्थापक | : | ०१ |
| २. | सहाय्यक वाहतूक अधिक्षक | : | ०१ |
| ३. | वाहतूक निरीक्षक | : | ०४ |
| ४. | सहाय्यक वाहतूक निरीक्षक | : | ०८ |
| ५. | वाहतूक नियंत्रक | : | २० |
| ६. | लिपीक | : | १० |
| ७. | सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक | : | ०१ |
| ८. | चार्जमन | : | ०२ |
| ९. | प्रशिक्षित यांत्रिक कर्मचारी | : | २५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | मदतनिस | : | १० |
| ११. | स्वीपर | : | ०३ |
| १२. | चालक | : | २८० |
| १३. | वाहक | : | २८० |

उपरोक्त कर्मचारी हे १०० नियतासाठी २ पाळ्यांमध्ये अंदाजे लागतील. कर्मचाऱ्यांना रजा,गणवेश, धुलाई भत्ता, मार्ग भत्ता, अतिकालीक भत्ता, इत्यादी सवलती द्याव्या लागतील.

०५. प्रति बस सरासरी उत्पन्न २३००/-रूपये मिळू शकते.इंधन खर्च उत्पन्नाचे ४२%,वेतन खर्च २८% शासकिय शुल्क खर्च, ५०% घसारा कर्ज व प्रशासकीय खर्च १.५% कार्यशाळा,सुटे भाग,टायर ट्युबचा खर्च ७% येतो.

०६. शहराअंतर्गत रिक्षा, मिनिडोअर, अॅटो रिक्षा, टॅक्सीज द्वारे होणारी अवैध प्रकारची वाहतूक बंद झाल्याशिवाय बस सर्व्हिस फायद्यात येणार नाही.

०७. महाराष्ट्र राज्य परिवहन सल्लागार समिती यांनी दि.२९.१२.२००४ रोजी मा.विभागीय आयुक्त यांना निवेदन दिले असून त्याची प्रत विभागीय आयुक्त कार्यालयातर्फे अवलोकनार्थस्तव व कार्यवाहीस्तव पाठविली आहे. त्यात औरंगाबाद शहर वाहतूकीच्या सेवेत १९७६-१९७७ ते २००३ पर्यंत २७ वर्षात रू.२६०५ लाख तोटा झाला आहे असे म्हटले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५ नुसार महानगरपालिकेस सदरील बस सेवा चालविणे बंधनकारक नाही. महानगरपालिकेचे ऐच्छिक कर्तव्य आहे. शहर बस वाहतूक सुरू करणेसाठी जागा, इमारती बांधणे, बसेस खरेदी करणे व अस्थापनावर करोडो रूपयाचा खर्च येणार असून महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता सदर तोट्यात चालणारी बससेवा महानगरपालिकेच्या ताब्यात न घेणे योग्य राहील.

मा.सर्वसाधारण सभेस अवगत करून हा निर्णय एस.टी.मंडळास कळविणे आहे, तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.महेश माळवतकर : महानगरपालिका एस.टी. बसेस चालविण्यास असमर्थ आहेत. या शहरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी जर खाजगी एखादी संस्था जर प्रवास देवू इच्छित असेल तर व महानगरपालिकेने त्यास मान्यत दिली पाहीजे. सिडको हडकोतील हजारो विद्यार्थ्यांचा प्रश्न सुटणार आहे. जर कोणी महानगरपालिकेची परवानगी घेवून मागणी केली तर, अशी सुविधा देता येईल, असे माझे मत आहे.

श्री.भागवत कराड : सिटी बसेस बंद करण्याचा प्रस्ताव आलेला आहे. महानगरपालिकेला सुध्दा हे परवडणारे नाही. तरी सुध्दा गोरगरीब व शालेय विद्यार्थ्यांसाठी सिटी बसेस चालू असण्याची गरज आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता हे परवडणारे नाही. या शहरातील किंवा शहराबाहेरील ज्या काही खाजगी संस्था असतील त्यांची सिटी सर्विसेस चालू ठेवण्याची इच्छा असेल, त्याप्रमाणे जाहीरात देण्यात यावी व खाजगी संस्थेमार्फत कूणी चालू ठेवत असेल तर, चालू करण्यात यावेत ही विनंती.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : ही सेवा महानगरपालिका देवू शकत नही, तशी परिस्थिती नाही. बस सेवा बंद न करता संबंधित विभागास विनंती करावी की, बस सेवा चालू ठेवावी व कमीशन बेसवर जे की, महानगरपालिकेस पैसे देतील व खाजगी बसेच चालवतील असे करता येत असेल तर ते करावे. ही बस सेवा कमीशन बेसवर महानगरपालिकेने चालवावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : सिटी बस सेवा घेवू नये. खाजगीकरण करावे.

मा.महापौर : एस.टी.महामंडळाने आणखी सहा महीने शहर बस वाहतूक चालवावे. मध्यतंरीच्या काळात आयुक्तांनी खाजगी संस्थेकडून शहर बस वाहतूक चालविणे

शक्य आहे का ते तपासून शक्य असल्यास शहर बस वाहतूक रॉयल्टी बेसिसवर चालविणेची पुढील कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता शहर बस वाहतूक महानगरपालिकेच्या ताब्यात न घेता एस.टी.महामंडळाने आणखी सहा महीने शहर बस वाहतूक चालवावी. मध्यतंरीच्या काळात आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी खाजगी संस्थेकडून शहर बस वाहतूक चालविणे शक्य आहे का ते तपासून शक्य असल्यास शहर बस वाहतूक रॉयल्टी बेसिसवर चालविणेची पुढील आवश्यक ती कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र.प्र.शा/निवडणूक/कृउबास/औ/०५/३१७६, दिनांक ३.८.२००५ अन्वये कळविले आहे की, महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ चे कलम १३ (१) (इ) नुसार कृषी बाजार समितीवर सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतील महापौर किंवा महापालिकेने निवडूण दिलेले प्रतिनिधी यांचे नांव जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे कार्यालयास कळविण्यास विनंती केली आहे. तरी कृषी उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ चे कलम १३ (१) (इ) नुसार औरंगाबाद महानगरपालिकेचा प्रतिनिधी कृषी उत्पन्न बाजार समिती, औरंगाबाद वर सदस्य म्हणून नियुक्ती करणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.संजय शिरसाट : या महानगरपालिकेत शिवसेना,भारतीय जनता पक्षाचे बहूमत आहे, त्यामूळे स.सदस्य श्री.रविंद्र लक्ष्मण गांगे यांचे नांव सूचवितो, त्यास मान्यता द्यावी.

श्री.अ.रशिद खान मामु : आघाडीतर्फे स.सदस्य श्री.वसंत नरवडे पाटील यांचे नांव सूचविण्यात येते, नसता यावर गुप्त मतदान घेवून निवड करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मा.महापौर सत्ता आपलीच आहे. एखादे पद विरोध पार्टीतील सदस्यांनांही देण्यात यावे.

श्री.संजय केनेकर : भारतीय जनता पक्षातर्फे स.सदस्य श्री.पुनमचंद बम्हणे यांचे नांव सूचविण्यात येते.

श्री.दिलीप गायकवाड : तीन नांवे सूचविण्यात आलेली आहे, मतदान पध्दतीने निवड करावी.

श्री.पुनमचंद बम्हणे : मी,माझे नांव परत घेत आहे.

श्री.वसंत नरवडे : माझे नांव परत घेत आहे. आपल्या स्तरावर निवड करावी.

मा.महापौर : तीन नांवे सूचविण्यात आलेली होती, त्यापैकी श्री.वसंत नरवडे पाटील, श्री.पुनमचंद बम्हणे यांनी त्यांचे नांव परत घेतलेले आहे. आता स.सदस्य श्री.रविंद्र लक्ष्मण गांगे यांचे एकच नांव शिल्लक राहील्याने त्यांची कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सदस्यपदी पाठविण्यास मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, , महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ चे कलम १३ (१) (इ) नुसार कृषी उत्पन्न बाजार समितीवर सदस्य म्हणून श्री.रविंद्र लक्ष्मण गांगे पालिका सदस्य यांची नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८/५ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला बायजीपुरा येथील न.भू.क्र.१२१६५, १२१६६, १२१६७, १२१७१, १२१७२, १२१७४ इत्यादी मिळकतीसाठी १५ फुट रूंदीचा रस्ता **Non D.P.** म्हणून न.भू.क्र.१२१६२/पैकी व १२१६३/पैकी मधून संपादन करावयाचा आहे.

उपरोक्त मिळकत न.भू.क्र.१२१६२ व १२१६३ ही संपूर्ण जमिन पूर्वी खुली होती. त्यामूळे वरील

मिळकतधारक खुल्या जागेतून ये-जा करत होते. परंतु त्यांनी सदर जागेस कुंपन भिंत बांधल्यामूळे न.भू.क्र.१२१६५, १२१६६, १२१६७, १२१७१, १२१७२, १२१७४ इत्यादीसाठी रस्ता उपलब्ध होत नसल्याने त्यांना जाण्या-येण्यासाठी त्रास होत असल्याने न.भू.क्र.१२१६२/पैकी व १२१६३/पैकी मधून १५ फुट रूंदीचा रस्ता **Non D.P.** म्हणून सार्वजनिक उपयोजासाठी भूसंपादन करावा लागेल. उक्त **Non D.P.** १५ फुट रूंद रस्त्याचा नकाशा मा.सर्वसाधारण सभेत बोर्डावर अवलोकनार्थ सादर केलेला आहे.

उपरोक्त १५ फुट **Non D.P.** रस्त्याच्या भूसंपादनासाठी अंदाजे रूपये १२,००,०००/- (रू.बारा लाख) खर्च अपेक्षित आहे. सबब उक्त भूसंपादन प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ व २०९ अन्वये मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.महापौर : प्रशासनाने या प्रस्तावाच्या संदर्भात खूलासा करावा.

मा.आयुक्त : या रस्त्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करू जास्तीचा एफएसआय देवून कार्यवाही करू जर याप्रमाणे कार्यवाही झाली नाही तर टीडीआर किंवा इतर जे नियम आहे, त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

श्री.गजानन बारवाल : रस्त्याची आवश्यकता आहे का?

मा.आयुक्त : तेथे लोकांना जाण्यासाठी रस्ताच नाही. म्हणून प्रस्ताव ठेवलेला आहे.

सौ.लता दलाल : रूपये १२ लक्ष देण्याची गरज नाही. एफएसआय देवून कार्यवाही होवू शकते.

श्री.संतोष खेंडके : ६ प्लॉटसाठी रस्ता देणे कितपत योग्य आहे. ज्यांना रस्ता पाहीजे त्यांचेकडून रक्कम घेण्यात यावी, महानगरपालिकेने खर्च करू नये.

मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, न.भू.क्र.१२१६२/पैकी व १२१६३/पैकी मधून १५ फुट रूंदीचा रस्ता**Non D.P.**म्हणून सार्वजनिकउपयोजासाठी भूसंपादन करणेस येणाऱ्या अंदाजे र.रू.१२,००,०००/- (रू.बारा लाख) अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९/६ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक २६०/२ दिनांक २० जानेवारी २००४ अन्वये वास्तुशास्त्रीयदृष्ट्या व ऐतिहासिकदृष्ट्या जतन करावयाच्या वास्तुंचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम -३७ अन्वये फेरबदल करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. त्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्रमांक २९ म्हणून प्रस्तावित करण्यांत येत आहे.

उक्त प्रस्तावित नियमामध्ये नियम क्रमांक २९.९ हा उपनियम रिपेअर फंड/देखभाल व दुरूस्ती निधी म्हणून प्रस्तावित केला आहे यामध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**Rule No. 29.9** In addition to the previous following paragraph is to be added.

" The Heritage Monuments which will be deemed fit to repair by the Heritage Committee Shall be repaired by the Corporation by using a Heritage found. For Heritage Building Repair Fund, the new surcharge shall be imposed at the rate of 2 % of the amount of Development Charges payable as per provision of Section 124 [A to L] of the Maharashtra Regional and Town Planing Act 1966, And separate account would be maintained for this. "

प्रस्तावित नियम क्रमांक २९.९ मध्ये वरीलप्रमाणे वाढ करण्यास मान्यता व्हावी. प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल : या विषयासंबंधी सविस्तर माहिती प्रशासनाकडून घ्यावी.

मा.आयुक्त : यात हेरीटेज फंडस् उभा करायचा आहे, ज्या काही हेरीटेजमध्ये जून्या इमारती आहे, त्याची देखभाल दूरूस्ती करणे सोपे होईल. इमारत परवानगीच्या वेळेस जे विकास कर लावतो, मुंबई धरतीवर २% सरचार्ज लागू करायचा, १० लक्ष वर्षाचे

अपेक्षित आहे. या शहरात ज्या ऐतिहासिक इमारती आहे, त्यासाठी या रक्कमेचा उपयोग होईल.

श्री.अ.रशिद खान मामु : सन २००४ मध्ये या इमारतीचे देखभाल करू म्हणून महानगरपालिकेने जबाबदारी घेतलेली आहे, हे काम महानगरपालिकेस करावे लागणार असून जनतेला २% बोजा कराचा का म्हणून आकारणी करायचा. वाणिज्य वापर जे करतात त्यांचेवर आकारावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : २२ % कर परवानगीसाठी अगोदरच लागतो पून्हा २% आकारणी केल्यास जास्त होईल.

मा.आयुक्त : २२% च्या २% असे होणार आहे. २२ टक्केचे २४ टक्के असे कर आकारणी होणार नाही.

श्री.गजानन बारवाल : प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नसावी.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

मा.आयुक्त : फक्त हेरीटेज इमारत असतील त्यासाठी खर्च करणार यापूर्वी हेरीटेज रूलस् मंजुर केलेले आहे, त्यावर सजेशन,ऑब्जेक्शन घेतले त्यामध्ये सजेशन आले की, २% प्रमाणे मुंबई धरतीवर आकारणी करावी.

सौ.लता दलाल : हेरीटेज इमारतीवर केंद्र शासन किंवा राज्य शासन यांनी खर्च करणे अपेक्षित आहे. ही जबाबदारी महानगरपालिकेकडे कशासाठी असा प्रश्न येतो. यासाठी शासनाकडून काही फंडस् मिळतो का? त्यानुसार हा खर्च करण्यात यावा, असे माझे मत आहे.

मा.आयुक्त : शासनाकडून यासाठी निधी उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्न केले जातील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक २६०/२ दिनांक २० जानेवारी २००४ अन्वये वास्तुशास्त्रीयदृष्ट्या व ऐतिहासिकदृष्ट्या जतन करावयाच्या वास्तुंचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम -३७ अन्वये फेरबदल करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. त्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्रमांक २९ म्हणून प्रस्तावित करण्यांत येत आहे. उक्त प्रस्तावित नियमामध्ये नियम क्रमांक २९.९ हा उपनियम रिपेअर फंड/देखभाल व दुरूस्ती निधी म्हणून प्रस्तावित केला आहे यामध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**Rule No. 29.9** In addition to the previous following paragraph is to be added.

" The Heritage Monuments which will be deemed fit to repair by the Heritage Committee Shall be repaired by the Corporation by using a Heritage found. For Heritage Building Repair Fund, the new surcharge shall be imposed at the rate of 2 % of the amount of Development Charges payable as per provision of Section 124 [A to L] of the Maharashtra Regional and Town Planing Act 1966, And separate account would be maintained for this. "

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०/७ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नविन माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा धोरण-२००३ ला मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली असून आयटी व आयटीइएस घटकांना खालीलप्रमाणे सवलती देण्याबाबत राज्य शासनाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.आयटीपी-२००३/प्रक्र.३३११/उद्योग-७, दिनांक १२ जुलै २००३ अन्वये शासन निर्णय पारीत केला असून सदरील शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व महापालिकांना निर्देश दिलेले आहेत. सदरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे प्रस्ताव विचारार्थ सादर करण्यांत येत आहे.

०१. आयात केलेल्या भांडवली मालावर व कच्या मालावर जकात वसुलीतुन सुट देणे.

०२. सर्व परवानग्या/मान्यता/परवाने देण्याबाबत एक खिडकी योजना राबविणे.

०३. १००% अतिरिक्त चटई क्षेत्राची सवलत लागू करणे.

०४. निवासी क्षेत्राकरीता ज्या दराने मालमत्ता कर आकारला जातो त्याच दराने आयटी व आयटीइएस घटकांच्या अस्थापनांवर आकारणे.

०५. माहिती तंत्रज्ञान उद्यानापासुन मुख्य महामार्गाना जोडणारे रस्त्यांचा विकास विकासकांच्या स्वत:च्या गुंतवणुकीतून करण्यासाठी सदर रस्ते विकासकांकडे हस्तांतरीत करणे, अशा गुंतवणुकीवरील खर्च माहिती तंत्रज्ञान उद्यानातील नव्या मालमत्तांवर महापालिकेकडे उपार्जिक होणाऱ्या भावी मालमत्ता करातुन वगळता समायोजित करणे. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नविन माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा धोरण-२००३ ला मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली असून आयटी व आयटीइएस घटकांना खालीलप्रमाणे सवलती देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

०१. आयात केलेल्या भांडवली मालावर व कच्या मालावर जकात वसुलीतुन सुट देणे.

०२. सर्व परवानग्या/मान्यता/परवाने देण्याबाबत एक खिडकी योजना राबविणे.

०३. १००% अतिरिक्त चटई क्षेत्राची सवलत लागू करणे.

०४. निवासी क्षेत्राकरीता ज्या दराने मालमत्ता कर आकारला जातो त्याच दराने आयटी व आयटीइएस घटकांच्या अस्थापनांवर आकारणे.

०५. माहिती तंत्रज्ञान उद्यानापासुन मुख्य महामार्गाना जोडणारे रस्त्यांचा विकास विकासकांच्या स्वत:च्या गुंतवणुकीतून करण्यासाठी सदर रस्ते विकासकांकडे हस्तांतरीत करणे, अशा गुंतवणुकीवरील खर्च माहिती तंत्रज्ञान उद्यानातील नव्या मालमत्तांवर महापालिकेकडे उपार्जिक होणाऱ्या भावी मालमत्ता करातुन वगळता समायोजित करणे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>चर्चा :</u>**

श्री.संजय शिरसाट : विषय पत्रिकेवर पुढील सर्व विषय चर्चेचे असून सर्वच विषयावर चर्चा होणार असेल तर वेळ लागेल त्यासाठी आजची सभा तहकूब करावी व पुढील आठ दिवसानंतर पून्हा सभा आयोजित करावी, अशी विनंती आहे.

मा.महापौर : आजची सभा तहकूब करण्यात येते, पुढील सभेची तारीख व वेळ स.सदस्यांना कळविण्यात येईल.

या बरोबरच आजची सभा तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.